**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २४ | बुधवार, दि.२० ते २६ मे २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# पुन्हा आयात की स्थानिक?

## भंडारा-गोंदिया विधान परिषद निवडणुकीत भाजपच्या उमेदवारीकडे लक्ष; चार वर्षांपासून होती रिक्त जागा

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:-** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची सोमवारी घोषणा झाल्यानंतर गेल्या चार वर्षांपासून रिक्त असलेल्या भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद सदस्यपदाच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. चार वर्षांपासून रिक्त असलेल्या या जागेवर भाजपकडून स्थानिक की, बाहेरचा उमेदवार दिला जातो याकडे लक्ष लागून आहे. यापूर्वी विरोधात लढत देणारे राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीत असल्याने भाजप ही जागा त्यांना सोडणार काय अशीही चर्चा वाढू लागली आहे.

गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील नगर परिषदा व नगरपंचायतींचा कार्यकाळ संपूनही निवडणुका न झाल्याने विधान परिषदेची ही निवडणूक लांबणीवर पडली होती. ५ डिसेंबर २०२२ला विधान परिषदेची जागा रिक्त झाली. यापूर्वीच ही निवडणूक होणे आवश्यक होते. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपल्याने, नव्याने निवडणुका न झाल्याने आणि निवडणूक



आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ७५ टक्यापेक्षा जास्त मतदारसंख्येची अट घातल्याने ही निवडणूक अडकली होती. आता शंभर टक्के निवडणुका झाल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

विधान परिषदेच्या या जागेसाठी ४३७ मतदार आपला मतहक्क बजावणार आहेत. यातील २१४ गोंदिया तर २२३ भंडारा जिल्ह्यातील आहेत. भंडारा जिल्ह्यात भाजपकडे ८५ तर काँग्रेसकडे ४५च्या जवळपास मतदार आहेत. त्याचप्रमाणे गोंदिया जिल्ह्यात भाजपकडे ८० तर काँग्रेसकडे ६१ मतदार आहेत. सध्याच्या घडीला मतदारसंख्येत भाजपची आघाडी दिसून येत असल्याने भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीने स्थानिक उमेदवार द्यावा, नागपूरचे पार्सल लादू नये, असा सूर उमटू लागला आहे.

मागील निवडणुकीत याच विषयावरून भाजपला पराभवाची चव चाखावी लागली होती. भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात २०१६मध्ये भाजपचे डॉ.परिणय फुके निवडून आले होते. त्यांनी राष्ट्रवादी काँगेसचे राजेंद्र जैन यांचा पराभव केला होता. फुके यांचा कार्यकाळ २०२२मध्ये संपल्याने त्यांना भाजपने विधान परिषदेवर इतर गटातून पाठविले. त्यामुळे या निवडणुकीत भाजप नागपूरचाच उमेदवार देणार की, जिल्ह्यातीलच एकाला उमेदवारी देणार याकडे लक्ष लागले आहे.

### काँग्रेसची स्वबळाची तयारी

**काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २०१६च्या निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार दिले होते. काँग्रेसकडून प्रफुल गोपालदास अग्रवाल तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून तत्कालीन आमदार राजेंद्र जैन रिंगणात होते. मतविभाजनात या निवडणुकीत भाजपने बाजी मारली होती. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचा घटक पक्ष आहे. आपला परंपरागत मतदारसंघ राष्ट्रवादी सोडणार की भाजप याकडे लक्ष लागून आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढण्याच्या तयारीत आहे.**

### मतदारसंघातून इच्छुक

राष्ट्रवादी (अप) : माजी आमदार राजेंद्र जैन, भंडारा जिल्हा बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे,काँग्रेस : प्रफुल अग्रवाल भाजप : विक्की कुकरेजा (नागपूर),सुनिल मेंढे, सीता रहागंडाले, रचना गहाणे, भावना कदम,विजय शिवणकर,प्रकाश बाळबुध्दे

### मतदार कोण?

- जिल्हा परिषद सदस्य
- पंचायत समिती सभापती
- नगर परिषद सदस्य
- नगरपंचायत सदस्य

### येथील बजावणार हक्क

- जिल्हा परिषद : भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती
- नगर परिषदा : गोंदिया, तिरोडा, भंडारा, तुमसर, पवनी, साकोली
- नगरपंचायत : देवरी, सालेकसा, अर्जुनी-मोरगाव, गोरेगाव, सडक-अर्जुनी, लाखनी, मोहाडी, लाखांदूर

**भंडारा जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या**



भाजप : १२
राष्ट्रवादी : १३
काँग्रेस : २१
शिवसेना : ०१
वंचित बहुजन आघाडी : ०१
बसप : ०१
अपक्ष : ०३
एकूण : ५२

**भंडारा नगर परिषद : ३६ मतदार**
(भाजप : २३, शिवसेना : ०५, काँग्रेस : ०४, राष्ट्रवादी काँग्रेस ०३)

**तुमसर नगर परिषद : ३४ मतदार**
(भाजप : १०, राष्ट्रवादी काँग्रेस : १०, काँग्रेस : ०३, शिवसेना : ०१, अपक्ष : ०९)

**पवनी नगर परिषद : २१ मतदार :**
(भाजप : १३, शिवसेना : ०४, राष्ट्रवादी काँग्रेस : ०२, अपक्ष : ०१)

**साकोली नगर परिषद : २१ मतदार**
(भाजप : ०८, काँग्रेस : ०७, अपक्ष : ०३, राष्ट्रवादी काँग्रेस : ०१, शिवसेना : ०१)

**लाखनी नगरपंचायत : १७ मतदार**
(राष्ट्रवादी काँग्रेस : ०८, भाजप : ०६, काँग्रेस : ०२, अपक्ष : ०१)

**मोहाडी नगरपंचायत : १७ मतदार**
(राष्ट्रवादी काँग्रेस : ०६, भाजप : ०९, काँग्रेस : ०२)

**लाखांदूर नगरपंचायत : १७ मतदार** (भाजप : ०९, काँग्रेस : ०६, अपक्ष : ०२)



**गोंदिया जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या**

भाजप : २६
काँग्रेस : १३
राष्ट्रवादी कॉंगेस : ०८
चाबी संघटना : ०४
अपक्ष : ०२
एकूण : ५३

**गोंदिया नगर परिषद : ४५ मतदार**
(काँग्रेस : १४, भाजप : १८, राष्ट्रवादी काँग्रेस ०५, शिवसेना (उबाठा) : ०२, बसप : ०२, अपक्ष : ०३)

**तिरोडा नगर परिषद : २१ मतदार**
(काँग्रेस : ०१, भाजप : ०६, राष्ट्रवादी काँग्रेस : १२, शिवसेना (उबाठा) : ०१)

**गोरेगाव नगरपंचायत : १८ मतदार**
(काँग्रेस : १०, भाजप : ०५, राष्ट्रवादी काँग्रेस ०२)

**सालेकसा नगरपंचायत : १८ मतदार**
(काँग्रेस : १०, भाजप : ०६, शिवसेना : ०१)

**देवरी नगरपंचायत : १७ मतदार**
(भाजप : ११, काँग्रेस : ०४, राष्ट्रवादी काँग्रेस : ०२)

**मोरगाव अर्जुनी नगरपंचायत : १७ मतदार**
( भाजप : ०७, राष्ट्रवादी काँग्रेस : ०४, काँग्रेस : ०४, अपक्ष : ०२)

**सडक अर्जुनी नगरपंचायत : १७ मतदार**
(राष्ट्रवादी काँग्रेस : ०७, बाहुबली पॅनल : ०३, अपक्ष : ०३, काँग्रेस : ०२, शिवसेना : ०१, भाजप : ०१)

# अंडरग्राउंड मार्गाच्या दुरावस्थेला घेवून शहरवासी आक्रमक



**गोंदिया :-** शहरातील सर्वात व्यस्त आणि महत्त्वाच्या असलेल्या अंडरग्राउंड मार्गाची दैनावस्था झाली आहे. दररोजी होणारी वाहतूकीची कोंडी तसेच अपघात हे नित्याचेच झाले असून १७ मे रोजी या मार्गाच्या दुरावस्थेला घेवून रस्त्यावर जनतेचा संताप उसळला. दरम्यान रस्तारोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान, आंदोलकांनी नगर परिषद आणि स्थानिक प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी करीत १५ ऑगस्टपूर्वी रस्ता बांधकाम सुरू झाले नाही तर भविष्यात आणखी तिव्र आंदोलन केले जाईल, त्यासाठी प्रशासन पूर्णपणे जबाबदार असेल. तसेच या मागणीला घेवून नगराध्यक्ष सचिन शेंडे यांना आंदोलनकर्त्यांनी निवेदन सादर केले.

सविस्तर अशे की, या मार्गाच्या दैनावस्थेला घेवून सन २०२३ मध्ये तीन दिवसाचे उपोषण करण्यात आले होते त्याची दखल घेत नगर परिषदेने ५ कोटी ६७ लाखाचा रस्ता दुरुस्तीचा प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावामुळे शहरातील नागरिकांना लवकरच या नरकयातने सारख्या परिस्थितीतून सुटका होईल, अशी आस होती, मात्र, तीन वर्षे उलटूनही जमिनीवर अजूनही कोणतीही प्रगती झालेली नाही तसेच प्रस्तावाचे केवळ एक आमिष दाखवून नागरिकांची दिशाभूल केल्याचा आरोप शहरवासी करू लागले आहेत. अंडरग्राउंड रस्त्याची अवस्था तशीच असल्याने दररोज हजारो नागरिक, शाळकरी मुले आणि वाहनचालकांचे अपघात होत आहेत. माहितीसाठी वारंवार लेखी आणि तोंडी विनंती करूनही प्रशासनाने समाधानकारक प्रतिसाद न दिल्याने, नागरिकांनी आज रस्ता अडवला.आंदोलना दरम्यान, प्रशासनाला घटनास्थळीच इशारा देण्यात आला की, हे आंदोलन केवळ प्रशासनाला झोपेतून जागे करण्यासाठी करण्यात आले. जर १५ ऑगस्ट पूर्वी रस्त्याचे बांधकाम सुरू झाले नाही, तर शहरातील जनता तीव्र आंदोलन करणार, अशी भूमिका आंदोनकर्त्यांनी घेतली आहे. दरम्यान या रास्तारोको आंदोलनाला प्रहार जनशक्ती पक्ष, गोंदिया जिल्हा तक्रार निवारण समिती आणि भूमिगत संघर्ष समितीकडून पाठिंबा मिळाला. काही दिवसापुर्वीच नगरसेवक लोकेश (कल्लु) यादव यांनी नाल्यांची स्वच्छता केली. त्यासाठीही प्रशासना ऐवजी त्यांनाच पुढाकार घ्यावा लागला. मात्र त्या रस्त्याची अवस्था बघून काल झालेल्या आंदोलनाचा उद्रेक झाल्यास त्याचे गंभीर परिणाम नगर परिषद प्रशासनाला भोगावे लागतील, असा इशाराही देण्यात आला.

### पावसाळ्यात वाहतुकीचे तीनतेरा

**रेल्वेमुळे शहर दोन विभागात वाटला आहे. जुना उड्डाणपूल तोडल्यानंतर शहरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली. मोठ्या प्रमाणात वाहतूक अंडरग्राउंड मार्गाने होत असते. मात्र पावसाळ्यात साचणारा पाणी या मुळे वाहतुकीची कोंडी होऊन वाहन धारकांना जीव मुठीत घेवून किंवा इतरत्र मार्गाने प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात हा प्रकार असला तरी अन्य दिवसातही नालीचा पाणी रस्त्यावर साचत असल्याने त्याचाही त्रास वाहनधारकांना सहन करावा लागत आहे. ही परिस्थिती स्थानिक नगर परिषद प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्या निदर्शनास असतांनाही यावर ठोस उपाययोजना झाली नसल्याने किमान आंदोलनाची दखल घेवून १५ ऑगस्ट रोजी रस्त्याची समस्या मार्गी लागेल, अशी आस शहरवासीयांना लागली आहे**

## राज्यातील १५ जिल्ह्यांत ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**गोंदिया :** राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या असून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे.

११ ते १७ मे २०२६ दरम्यानच्या कालावधीतील अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे.

ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही.

# शेतकऱ्याचे पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन



**गोंदिया :** जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील पालेवाडा येथे एका शेतकऱ्याने महसूल नोंदीतून शेतजमीन कमी झाल्याचा आरोप करत थेट पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू केले आहे. कृष्णकुमार डोये असे आंदोलनकर्त्या शेतकऱ्याचे नाव असून, ङ्गजोपर्यंत जमीन पुन्हा रेकॉर्डवर येत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही,ङ्क अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

शेतकरी कृष्णकुमार डोये यांनी महसूल विभागावर गंभीर आरोप करत सांगितले की, त्यांच्या हक्काची सुमारे १.६७ हेक्टर शेतजमीन महसूल नोंदीतून कमी करण्यात आली आहे. यासंदर्भात त्यांनी महसूल विभाग, तहसील कार्यालय तसेच विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने आणि पत्रव्यवहार केला. मात्र अद्याप कोणतीही ठोस चौकशी किंवा निर्णय झाला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.डोये यांनी दिलेल्या माहितीनुसार, मौजा पालेवाडा येथील जुना गट क्रमांक ३३६ अंतर्गत त्यांच्या वडिलांच्या नावे एकूण १०.१४ हेक्टर शेतजमीन नोंद होती. सन १९८९ मध्ये संबंधित जमिनीची कायदेशीर विभागणी करण्यात आली होती. त्यानुसार गट क्रमांक ३३६/४ आणि ३३६/५ असे भाग पाडून संबंधित कुटुंबीयांच्या नावे फेरफार नोंदी करण्यात आल्या होत्या.

तलाठी कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, जुना गट क्रमांक ३३६ हा नवीन गट क्रमांक ४१७ मध्ये रूपांतरित करण्यात आला. मात्र नव्या महसूल नोंदीमध्ये एकूण क्षेत्रफळ १०.१४ हेक्टरऐवजी केवळ ८.४७ हेक्टर दाखविण्यात आल्याने सुमारे १.६७ हेक्टर जमीन गायब झाल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे.प्रशासनाकडून अद्याप कोणतेही ठोस आश्वासन न मिळाल्याने अखेर कृष्णकुमार डोये यांनी गावातील पाण्याच्या टाकीवर चढून ङ्गशोले स्टाईलफ आंदोलन सुरू केले आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीव्दारे महिला व बाल विकास विभागाच्या संस्थांना भेट

गोंदिया : जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तपासणी समितीव्दारे बालकांच्या काळजी घेणाऱ्या संस्था, शासकीय मुलांचे निरिक्षणगृह बालगृह आणि आसरा शिशुगृह (विशेष दत्तक संस्था) येथे भेट देवुन तपासणी करण्यात आली. महिला व बाल विकास विभागाच्या शासकीय मुलांचे निरीक्षणगृह बालगृहामध्ये ६ ते १८ वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रीत, पळून आलेले, हरवलेले, बालविवाह, बालकामगार म्हणुन मिळून आलेल्या काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांना बालगृहात, तर विधीसंघर्षग्रस्त बालकांना निरीक्षणगृहात बाल कल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ यांच्या आदेशान्वये दाखल करण्यात येतात. तसेच ० ते ६ वर्ष वयोगटातील अनाथ परित्यागीत आणि सोडून दिलेल्या बालकांना विशेष दत्तक संस्था (शिशुगृह) येथे दाखल करण्यात येतात. केंद्रीय दत्तक विधान प्रक्रियाव्दारे न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करुन सदर बालकांना दत्तकाकरिता मुक्त करुन दत्तक देण्यात येतात.

सदर संस्थाची तपासणी जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हास्तरीय तपासणी समितीव्दारे संस्थांमध्ये उपलब्ध सोई सुविधांची पाहणी करण्यात आली.

# 'ऑपरेशन अंतिम प्रहार' ;८ माओवाद्यांना शस्त्रांसह अटक

**गडचिरोली :-** गडचिरोलीतील माओवाद जवळजवळ संपुष्टात आला आहे. उर्वरित माओवाद्यांना आत्मसमर्पणासाठी आवाहन करण्यात येत होते. मात्र काही माओवादी लपून होते. त्यांचा शोध घेण्यासाठी मऑपरेशन अंतिम प्रहारफ राबविण्यात आले. या मोहीमेद्वारे पोलिसांनी शिताफीने तेलंगाणा राज्यातून ४ व महाराष्ट्रातील कुमनार येथून २ व नैताळा येथून २ अशा ८ माओवाद्यांना मोठ्या शस्त्रसाठ्यासह अटक केली. त्यांच्या शिरावर ६४ लाखांचे बक्षीस होते.




विशेष अभियान पथक, पोलिस पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तेलंगाणा राज्यातील विकाराबाद जिल्ह्यातील रुकमापूर रेल्वे स्टेशनवर बुधवारी पोहोचून माहितीची खातरजमा केली. ३ अनोळखी पुरुष व १ महिला यांनी पोलिस पथकास पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला.

पथकाने त्यांचा पाठलाग करून ताब्यात घेतले. यात जयराम मोंगे गावडे (रा. गिनलगुडा, ता. एटापल्ली) प्रभाकर याचा बॉडीगार्ड मुकेश ऊर्फ लच्छु लक्कु अवलाम (रा. पिडीया, जि. बीजापूर, छत्तीसगड), विजय ऊर्फ मंगडू हुंगा तामो (रा. चिमलीपेंटा, जि. सुकमा छत्तीसगड), रजिता ऊर्फ शामबत्ती कोसा मडावी (रा. कोंडाकोट, जि. नारायणपूर छत्तीसगड) यांचा समावेश आहे.

### वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

**या कारवाई विशेष पोलिस महानिरीक्षक नागपूर संदीप पाटील, पोलिस उपमहानिरीक्षक योगेश कुमार, उपमहानिरीक्षक सीआरपीएफ अजय कुमार शर्मा, पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर पोलिस अधीक्षक कार्तिक मधिरा, गोकुल राज जी., पोलिस उपअधीक्षक नागरगोजे, उपविभागीय पोलिस अधिकारी भामरागड अमर मोहिते, हेडरी रांजणकर, जिमलगट्टा राहुल मडावी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.**

### कुमनार गावातून दोन नक्षल्यांना अटक

**लाहेरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुमनार व पोमके गर्देवाडा हद्दीतील नैताळा येथे गुरूवारी काही सशस्त्र माओवादी पोमकेंद्रवर हल्ला करण्याच्या उद्देशाने लपून असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिस दल व सीआरपीएफकडून कुमनार गावात अपर पोलिस अधीक्षक कार्तिक मधिरा यांच्या नेतृत्वात शोधअभियान राबविण्यात आले. पोलिसांची चाहूल लागताच माओवाद्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून त्यांना १ एके ४७ रायफल, एक ३०३ रायफल, १ बारा बोअर रायफल व इतर माओवादी साहित्यासह त्यानंतर शनिवारी गुंडेनुर जंगलात शस्त्रासह ६३ लाख ८४ हजार रुपये जप्त केले.**

### नैताळात दोन माओवादी जेरबंद

**अपर पोलिस अधीक्षक गोकुल राज जी. यांच्या नेतृत्वाखाली पोमके गर्दैवाडा हद्दीतील नैताळा गावात शोध अभियानात दोघांना ताब्यात घेतले. मात्र काही माओवादी पसार झाले. ज्योती उर्फ अकिला उर्फ समिता पोटावी व आमती उर्फ आयती उर्फ संध्या इडमा पोडीयाम अशी अटकेतील माओवाद्यांची नावे आहे. त्यांनी दिलेल्या माहितीवरून शनिवारी शस्त्रसाठा जप्त केला.**

# ५ वरिष्ठ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**गडचिरोली:-** जिल्ह्यातील माओवाद आता जवळजवळ संपुष्टात आला. आत्मसमर्पण योजनेअंतर्गत शनिवारी वरिष्ठ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिस व सीआरपीएफ समोर आत्मसमर्पण केले. या सर्वांवर ३८ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

कुतुल एरिया कुरिअर टीम डिव्हीसीएम मधु ऊर्फ राकेश ऊर्फ बाजीराव बुकलू वेळदा (५२ रा. बुर्गी (पि.), ता. एटापल्ली), पीपीसीएम कंपनी क्र. ७ चा जीवन ऊर्फ जग्गू ऊर्फ भीमा देवा मडकाम (२६ रा. तोयाम, जि. सुकमा छत्तीसगड), नेलणार टेक्नीकल टीमची एसीएम रजनी ऊर्फ दुर्गा ऊर्फ रामाती धुर्वा (४० रा. कातुलझोरा, जि. मानपूर छत्तीसगड), कंपनी क्र. १० सदस्य मंगली रघू कुरसाम (२२ रा. सवनार, जि. बिजापुर छत्तीसगड), स्टाफ टीम सदस्य लक्ष्मी डेंगा पुनेम (२५, रा. शिकुरभट्टी, जि. बिजापूर छत्तीसगड) अशी आत्मसमर्पित नक्षल्यांची नावे आहेत. त्यांनी सीआरपीएफ उपमहानिरीक्षक अजयकुमार शर्मा, पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर पोलिस अधीक्षक कार्तिक मधिरा, गोकुल राज जी., सीआरपीएफ द्वितीय कमान अधिकारी नरेंद्र कुमार,उपकमांडण्ट सुमित वर्मा तसेच पोलिस उपअधीक्षक विशाल नागरगोजे यांच्या उपस्थित आत्मसमर्पण केले.




### दलममध्ये विविध वरिष्ठ पदावर होत कार्यरत

**मधु वेळदा हा ऑगस्ट २००१ साली कसनसूर दलममध्ये भरती झाला. २००९ मध्ये डिव्हीसीएम पदावर पदोन्नती होवून कुतुल एरियामध्ये आजपावेतो कुरियरचे काम करीत होता. त्याच्यावर १ दरोड्याचा गुन्हा दाखल आहे. जीवन मडकाम हा २०१० साली कोंटा दलममध्ये सदस्य पदावर भरती झाला. २०२० मध्ये कंपनी क्र. ७ मध्ये पिपिसीएम पदावर पदोन्नती होवून आजपावेतो काम केले. रजनी धुर्वा ही २००१ मध्ये टिपागड दलममध्ये सदस्य पदावर भरती झाली. २००९ मध्ये नेलणार एरिया टेक्नीकल टीममध्ये बदली होऊन एसीएम पदावर आजपावेतो काम केले. मंगली कुरसाम ही २०२० साली गंगालुर दलममध्ये सदस्य पदावर भरती झाली. २०२४ साली कंपनी क्र. १० बदली होवून आजपावेतो काम केले. लक्ष्मी पुनेम ही जानेवारी २०१५ साली जगरगुंडा दलममध्ये सदस्य पदावर भरती झाली.**

### आतापर्यंत ८१९ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**विशेष म्हणजे, १५ ऑक्टोंबर २०२५ मध्ये मल्लोजुला वेनुगोपाल राव ऊर्फ भुपती ऊर्फ सोनू याच्यासह ६१ माओवाद्यांनी ५४ अग्निशस्त्रांसह मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समोर आत्मसमर्पण केले होते. आतापर्यंत एकूण ८१९ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिस दलासमोर आत्मसमर्पण केले.**

## संपादकीय

### नीटचा पेपर रद्द ; विद्यार्थ्यांचा दोष काय?

नीटचा पेपर फुटला. तो एवढ्या प्रमाणात फुटला की सरकारला नीटची झालेली परिक्षाच कॅन्सल करावी लागली. हे सगळं बरोबर असलं तरी पेपर फुटीचं राजकारण न समजलेलं कोडं आहे. ज्या विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास केला आणि पेपर चांगला सोडवला. त्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचं व चांगला पेपर सोडविण्याचं काय? शिवाय हाच पेपर नव्याने पुढे घेतल्यानंतर आज ज्या विद्यार्थ्यांचा पेपर चांगला गेला होता. त्याचा पुढील पेपर चांगला न गेल्यास त्याच्या भवितव्याचं काय? हाही प्रश्न जनसामान्य लोकांना पडलेला असून तो भेडसावत आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांच्या मेडीकल प्रवेशासाठी सक्षम ठरविणारी नीटची परिक्षा. ज्यातून ती रद्द करण्यात आली व नीटच नाही तर संपुर्ण परिक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्हं उभं राहिलं. तसं पाहिल्यास ह्या परिक्षा ज्या आताच्या काळात घेतल्या जातात. त्या परिक्षेचे पेपर फुटतातच कसे? हाही आणखी एक प्रश्न उभा राहतो.

पेपरफुटीची समस्या ही आजची नाही. ही दहा वर्षापासून सुरु आहे. सन २०१६ मध्ये रिव्यू ऑफिसर पदाच्या परिक्षेचा लखनौमध्ये पेपर फुटला. सन २०१७ मध्ये बारावीचा बूक किंपिंग आणि अकाउंटन्सीचा पेपर फुटला. याचवर्षी स्टॉप सिलेक्शन कमिशनचा टेपर फुटला. सन २०१८ मध्ये पेपर फुटण्याच्या चर्चेवरुन दहावी, बारावीच्या गणित व अर्थशास्त्राच्या परिक्षा पुन्हा घेण्यात आल्या. याचवर्षी गुजरातमध्ये पोलीस भर्तीचा पेपर फुटला. सन २०१९ मध्ये रेल्वे भर्तीचा पेपर फुटला. सन २०२० मध्ये विधी विभागाचा पेपर फुटला. याचवर्षी उत्तर प्रदेशात बारावीचा पेपर फुटला. सन २०२१ मध्ये उत्तर प्रदेशात टि ई टी चा पेपर फुटला. याचवर्षी नीटचाही पेपर फुटला. सन २०२२ मध्ये उत्तर प्रदेशात लेखपाल भर्तीचा पेपर फुटला. याचवेळेस बिहारमध्ये लोकसेवा आयोगाचा पेपर फुटला. सन २०२४ मध्ये नीटचा पेपर फुटला. तसेच यावर्षी म्हणजेच २०२६ मध्ये बारावीचे काही पेपर फुटले आणि आता नीटचा पेपर फुटला.

पुर्वी असं नव्हतं. कोणतेच पेपर फुटत नव्हते. लोकं इमानदार होते व ते पेपर फोडण्याच्या भानगडीत नसायचे. शिवाय त्या काळात न्यायालयही सक्षमतेने दोषींवर कडक कारवाई करायचं. परंतु आज तसं नाही. आज दहा निर्दोषांचं नुकसान झालं तरी चालेल. परंतु एका दोषी व्यक्तींवर कारवाई व्हायला नको. अशी अवस्था आहे. आज दोषींवर सरकारही जास्त कडक स्वरुपाची कारवाई करीत नाही आणि न्यायालयही नाही. दोषींना मिळते, अतिशय सौम्य स्वरुपाची शिक्षा. ज्यातून त्यांची हिंमत वाढते व पेपर फोडला जातो. फुटतो. ज्यातून अकार्यक्षम, सक्षम नसलेल्या विद्यार्थ्यांचा फायदा होतो. परंतु जे विद्यार्थी वर्षभर अगदी डोळे फोडून अभ्यास करतात. त्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचं काय? त्यांची क्रमवारी घसरत असल्यानं अशा विद्यार्थ्यांचा पुढील लायक असलेल्या शिक्षणासाठी वर्णी लागत नाही. ज्यातून त्यांचं भवितव्य अंधकारमय होतं.

सध्याच्या काळात प्रत्येक वर्षी कोणते ना कोणते पेपर फुटतच आहेत. ज्यातून विद्यार्थ्यांचा मानसिक ताण वाढत आहे. एवढंच नाही तर ज्या केंद्रावर पेपर फुटतो. त्या केंद्रावरील इतर विद्यार्थ्यांचा दोष नसतांना त्या केंद्रावरील सर्वच विद्यार्थ्यांनी कॉपी केलेली असेल. अशी शंका घेवून इतर विद्यार्थ्यांनी सोडविलेले पेपर अधिक काटकसरीनं तपासले जातात. ज्यातून इतर होतकरु विद्यार्थ्यांचं नुकसानच केलं जातं. यात त्यांचा दोष नसतोच. तरीही असं घडतंच. आज विद्यार्थ्यांचा जो पेपर फुटतो. तो पेपर का फुटू शकतो? त्याचं कारण आहे, विद्यार्थ्यांबाबत राबवली जात असलेली परिक्षा यंत्रणा. जी यंत्रणा गोपनीय स्वरुपाची असायला हवी. परंतु राहात नाही. शिवाय दोषींवर कारवाई होते. परंतु तात्पुरत्या स्वरुपाची. ठोस कारवाई होतच नाही. ना न्यायालय त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आदेश देत. ना शासन कडक पावलं उचलत. ज्यातून अशा घटना दरवर्षी होत आहेत. व्यतिरिक्त शासन त्यांच्यावर कडक कारवाई न करता परिक्षा पद्धतच रद्द करुन टाकतात. ज्यातून नुकसान आपलं थोडंच झालं. विद्यार्थ्यांचं झालं ना. होवू दे. आपलं काय जातं? अशा प्रकारची उदासिनता घेवून सर्रास झालेली परिक्षाच रद्द केली जात आहे. ज्यातून विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब होत आहे.

महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की शासनानं अशी परिक्षा रद्द करु नये. अशी परिक्षा रद्द न करता दोषींवर कडक कारवाई करावी. त्यातच शासनाला जमत नसेल तर न्यायालयानं तरी दोषींवर कडक कारवाई करावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांचं भवितव्य खराब होवू नये. राहिला प्रश्न पेपर फुटल्याचा. तर पेपर फोडून जेही विद्यार्थी पास होतात. ते सक्षम असतातच असे नाही. समजा ते सक्षम झालेही अभ्यासक्रमासाठी. तरी त्या विद्यार्थ्यात शैक्षणिक गुण नसल्यानं ते विद्यार्थी पुढील अभ्यासक्रम शिकतांना त्या अभ्यासक्रमातून कधीच पुढे जावू शकत नाही. कारण कावळ्याला कितीही साबन, पावडर वा पेंट लावून दिला. तरीही कावळा काळाच असेल. तो पांढरा बनणार नाही. तसंच परिक्षेचं आहे. कारण हिरा हा हिराच असतो. तो कोळशात जरी लपून बसला असला तरी. त्यामुळंच पेपर जरी फुटला असला तरी सरकारनं यापुढं परिक्षा रद्द करु नये. दोषींवर पाहिजे त्या प्रमाणात कडक कारवाई करावी. जेणेकरुन पुढील पेपर फोडतांना वारंवार विचार करावा लागेल.

# गोसे बॅकवॉटरबाधित हे प्रकल्पग्रस्तच-मेधा पाटकर

## वैनाकाठ फाउंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा थाटात संपन्न

**भंडारा:–** गोसेखुर्द धरणामुळे दोनशे गाव प्रभावी झाले आहेत. आज धरण पूर्णपणे भरल्यानंतर अनेक गावांना बॅकवॉटरचा फटका बसला आहे. शासनाने या बॅकवॉटरबाधितांना पूरग्रस्त ठरविले आहे जेव्हा की, हे सगळे प्रकल्पबाधित आहेत. शासनाने यांना प्रकल्पबाधिताप्रमाणे मदत द्यावी असे प्रतिपादन मेधा पाटकर यांनी केले.त्या भंडारा येथे आयोजित वैनाकाठ फाउंडेशनच्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होत्या.

युगसंवाद चळवळीद्वारा आयोजित वैनाकाठ फाऊंडेशन भंडारा च्या राज्यस्तरीय साहित्य, समाज व शिक्षण क्षेत्रातील पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन सार्वजनिक वाचनालय भंडाराच्या इंद्रराज सभागृहात करण्यात आले होते.या समारंभाच्या अध्यक्षस्थानी वैनाकाठ फाउंडेशनचे अध्यक्ष अमृत बन्सोड होते. पुरस्कार वितरण महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष व अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ?. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल हे होते. विशेष संबोधक म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर उपस्थित होत्या. याप्रसंगी वैनाकाठ फाउंडेशनच्या वतीने मुकुंदराज काव्य पुरस्कार अक्षय शिंपी मुंबई, घनश्याम डोंगरे कथा पुरस्कार पंकज कुरुलकर मुंबई, ना.रा.शेंडे कादंबरी पुरस्कार योगीनी वेंगुर्लेकर, पुणे, अनिल नितनवरे समीक्षा पुरस्कार प्रा.चंद्रकार बाबर सांगली, डॉ.आंबेडकर वैचारिक ग्रंथ पुरस्कार अस्मिता जोशी–राजे पुणे यांना रोख पाच हजार रुपये, मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

महात्मा कालिचरण नंदागवळी समाजमित्र पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना तर जे.पी.नाईक शिक्षणमित्र पुरस्कार श्रीकांत एकुडे, ससा जिल्हा चंद्रपूर ब्राईट एज फाउंडेशन,मॅजिक फाउंडेशन यांना अकरा हजार रुपये रोख,मानपत्र,सन्मानचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी सार्वजनिक वाचनालय



भंडाऱ्याच्यावतीने म.रा.विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, ज्येष्ठ समाजसेविका मेधा पाटकर यांचा सन्मानचिन्ह, शाल देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. रवींद्र शोभणे यांनी आपल्या भाषणातून वैनाकाठ फाउंडेशनने सुरू केलेल्या साहित्य समाज व शिक्षण क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कारामुळे साहित्यिकांना, समाजसेवा व शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्यांना ऊर्जा व प्रेरणा मिळून भविष्यात त्यांचे हातून मोठे कार्य होईल असे सांगितले.धनंजय दलाल यांनी गोसेखुर्द धरणग्रस्तांच्या समस्यांच्या निवारणासाठी नव्याने लढा उभारण्याची गरज असल्याचे सांगितले.

"**विस्थापन समस्या:** वैनगंगा आणि नर्मदेच्या संदर्भात'या विषयावर बोलतांना मेधा पाटकर म्हणाल्या नवनिर्माण, औद्योगिक विकास यालाच विकास म्हणायचा का? मग निसर्गाच काय?आम्ही नर्मदा बचाव म्हणताना घर बचाव,घर बनाव असेही म्हणतो कारण आज विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडणे सुरु आहे. उत्तराखंडमध्ये याचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. विकासाच्या नावाखाली उत्तराखंडातील जोशी मठाची झालेली अवस्था पाहिली की लक्षात येते की विकास कसा विनाशाकडे चालला आहे.

संविधानातील समता व न्याय ही मूल्ये विकासाच्या नावाखाली पायदळी तुडवली जात आहेत. देशात विषमता बिभत्स रुप धारण करून उभी आहे.भारतात सर्वाधिक श्रीमंत असलेल्या एक टक्का उद्योगपतींचे भरमसाठ कर्ज माफ केले जातात परंतु सर्वाधिक रोजगार देणाऱ्या शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष केले जाते. शेतमालाला हमीभाव नाही तर योग्य भाव पाहिजे. आता भारतात आज एकही नदी स्वच्छ राहिलेली नाही. भारतातील एक–एक नदी वाचवणे गरजेचे आहे. नदीचे वाहत राहणे हे मानवी जीवनाच्या प्रगतीचे धोतक आहे. जगात सगळीकडे नद्यांवर बांधलेली मोठी धरणे निरस्त केली जात आहेत. स्वच्छ, शुद्ध पाण्यासाठी व पृथ्वीच्या हिरव्या आच्छादनासाठी आता सर्वांनी एकजूट होणे गरजेचे आहे असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी परीक्षकाच्यावतीने डॉ. जगदीश गुजरकर यांनी पुरस्कार निवडीबद्दल मत व्यक्त केले. पुरस्कार प्राप्त लेखिका अस्मिता जोशी–राजे तसेच शिक्षणमित्र पुरस्कार प्राप्त श्रीकांत एकुडे यांनी मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणातून अमृत बन्सोड यांनी लेखकांनी कार्यकर्त्याच्या पातळीवर येऊन लिहायला पाहिजे त्याशिवाय प्रेरणादायी साहित्य निर्माण होऊ शकत नाही असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ.सुरेश खोब्रागडे यांनी केले. प्रास्ताविक विवेक कापगते यांनी तर मानपत्रांचे वाचन डॉ. जयश्री सातोकर यांनी केले आभार प्रा. नरेश आंबिलकर यांनी मानले.

कार्यक्रमाला महेश लिंबाचिया मुंबई, प्रल्हाद सोनेवाणे, डॉ. दशरथ कापगते, डॉ. गुरुप्रसाद पखमोडे, डॉ. गिरीश सपाटे,डॉ. पवन कांबळी, डॉ. के.एल.देशपांडे, डॉ.कविता राजाभोज, युवराज गंगाराम, महात्मा कालिचरण नंदागवळी यांची नात भालाधरे मॅडम, मंगला गणवीर डॉ. संजयकुमार निंबेकर, नीळकंठ रणदिवे, हर्षल मेश्राम, ईश्वरलाल काबरा, विनोद आकरे, ढगे, रामेश्वर बागडे, संजय जांभुळकर चंद्रशेखर भिवगडे, अविल बोरकर,माजी नगराध्यक्ष महेन्द्र गणवीर, डॉ.गणेश वानखेडे यासह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैनाकाठचे मुख्य संयोजक प्रमोदकुमार अणेराव, सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल धनश्याम कानतोडे, महेश साखरवाडे, दिनेश हरडे, युवराज साठवणे, मारोती वाघमारे यांनी अथक परिश्रम घेतले.

## जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्रब रकाना ठेवा, ओबीसी संघटनांची मागणी



**गोंदिया/भंडारा :–** भंडारा गोंदिया जिल्ह्यात शनिवारपासून अधिकृतपणे गृहगणनेला सुरुवात झाली असली, तरी तुमसर तालुक्यातील खापा येथे या प्रक्रियेला पहिल्याच दिवशी स्थानिक नागरिकांच्या तीव्र रोषाचा सामना करावा लागला आहे. २०२६–२७ च्या या जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) स्वतंत्रब कॉलम नसल्याने संतप्त झालेल्या खापा ग्रामस्थांनी जनगणनेवर थेट बहिष्कार टाकला आहे.गावात दाखल झालेल्या जनगणना कर्मचाऱ्यांना गावकऱ्यांनी स्पष्ट शब्दांत नकार देत आल्यापावली परत पाठवले. जोपर्यंत जनगणनेच्या अर्जात ओबीसींसाठी स्वतंत्रब रकाना समाविष्ट केला जात नाही, तोपर्यंत खापा गावात कोणत्याही प्रकारची जनगणना करू दिली जाणार नाही, अशी ठाम भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

सन २०२७ च्या जनगणनेला सुरुवात झाली असून यात ओबीसी समाजासाठी स्वतंत्रब रकाना ठेवण्यात आला नाही. त्यामुळे देशात ओबीसी समाजबांधवांची संख्या किती हे कळणार कसे, असा सवाल उपस्थित करीत ओबीसी संघटनांना जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्रब रकाना ठेवण्यात यावा, या मागणीसाठी जनगणनेवर बहिष्कार टाकला आहे. यासाठी जिल्ह्यातील गावागावात जनजागृती केली जात आहे. गोरेगाव तालुक्यातील कवलेवाडा, डोंगरूटोला, इसाटोला, गिधाडी, घोटी, आमगाव तालुक्यातील पाटीलटोला, आसोली, फुक्कीमेठा, बिरसी, बाम्हणी, गिरोला येथील जनगणनेवर बहिष्कार टाकला. सडक अर्जुनी तालुक्यातही मोठ्या प्रमाणात गावकरी एकत्रब येत विरोध करु लागले आहेत.

एससी, एसटी व ओपन कॉलम असून ओबीसी कॉलम नसल्याचा रोष ओबीसी (इतर मागासवर्गीय जाती) भारत सरकारने भारताची जनगणना १६ मे पासून सुरुवात केली आहे. सदर जनगणनेत एससी, एसटी, ओपन असे कॉलम आहेत. परंतु, ओबीसीचा स्वतंत्रब कॉलम नाही, म्हणून ओबीसींचा कॉलम नसल्याने ओबीसी समाजाच्या जनतेचा सहभाग जनगणनेत राहणार नाही. कारण की, आमच्या मुलां–मुलींना शिक्षणामध्ये, नोकरीमध्ये आरक्षण व कोणतीही सवलत मिळणार नाही. सर्व ओबीसी बांधवांनी या जनगणनेवर बहिष्कार टाकला आहे.

## ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमच्या मागणीकरीता मोहाडी तालुका सरपंच संघटनेची सभा




**मोहाडी:–** आगामी जनगणनेमध्ये ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम नसल्याच्या निषेधार्थ मोहाडी तालुका सरपंच संघटनेच्या वतीने दि. १५ मे रोजी पंचायत समिती सभागृह मोहाडी येथे सभा पार पडली. या सभेमध्ये ओबीसी समाजासाठी स्वतंत्र जनगणना कॉलमचा समावेश करण्यात यावा अन्यथा जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला.सभेला ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजकुमार माटे यांनीप्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून ओबीसी समाजाच्या हक्कांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, देशातील ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या समोर न आल्यामुळे शिक्षण, रोजगार, राजकीयप्रतिनिधित्व, शासकीय योजना आणि निधी वाटपामध्ये ओबीसी समाजाला अपेक्षित प्रमाणात न्याय मिळत नसल्याची भावना समाजामध्ये वाढत आहे. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेताना ओबीसी समाजाचे प्रश्न दुय्यम राहतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

ही सभा मोहाडी तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष भूपेंद्र नागफासे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेमध्ये उपस्थित सर्व सरपंचांनी एकमताने निर्णय घेतला की, जनगणनेमध्ये ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश न झाल्यास या जनगणनेवर बहिष्कार टाकण्यात यावा तसेच गावागावात जाऊन ओबीसी समाजामध्ये व्यापक जनजागृती करण्यात यावी.यावेळी ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, आरक्षण व योजनांचा योग्य लाभमिळण्यासाठी स्वतंत्र ओबीसी जनगणना अत्यंत गरजेची असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच सर्वांनी एकमुखाने ओबीसी कॉलमच्या मागणीसाठी शासनाकडे जोरदार पाठपुरावा करण्याबाबत चर्चा केली.

सभेला प्रामुख्याने श्रीकृष्ण मेहर, महिंद्र मते, चांगदेव रघुते, शारदा गाढवे, रेश्माईश्वरकर यांच्यासहतालुक्यातील अनेक सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओबीसी समाजाच्या अस्तित्व, हक्क व न्यायासाठी स्वतंत्र जनगणना कॉलममिळेपर्यंतलढा सुरू राहील, असा निर्धार यावेळी उपस्थित सरपंचांनी व्यक्त केला.

## वादळासह अवकाळी पाऊस : निंबा परिसरात मोठे नुकसान

**गोरेगाव :–** ग्राम पंचायत निंबा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये शनिवारी अचानक आलेल्या चक्रीवादळासह अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी वृक्षे उन्मळून पडली असून अनेक घरांवरील पत्रे, कवेलु, उडून गेल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला असून रस्त्यांवर वृक्ष पडल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला.

नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक कुटुंबांचे संसारोपयोगी साहित्य व शेतीपिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या भागात उन्हाळी हंगामात रब्बी धान पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. सध्या धान कापणीचा हंगाम सुरू असताना अचानक आलेल्या पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या धान

पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतांमध्ये कापणीस आलेले धान आडवे पडले असून शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. सरपंच वर्षाताई विजय पटले यांनी ग्राम पंचायत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तलाठी, लाईनमन, वनविभागाचे कर्मचारी, वनरक्षक, कृषी विभागाचे कृषी सहाय्यक यांना गावात बोलावून नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याबाबत सरपंच वर्षाताई

विजय पटले यांनी शासनाकडे मागणी करताना सांगितले की, चक्रीवादळ, अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे नागरिकांच्या घरांचे तसेच शेतकऱ्यांच्या धान



पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाने त्वरित पंचनामे करून नुकसानग्रस्त नागरिक व शेतकऱ्यांना आर्थिक मदत व योग्य भरपाई द्यावी. ग्रामस्थांनीही प्रशासनाकडे तातडीने मदतकार्य राबवून नुकसानग्रस्तांना दिलासा देण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायत निंबा प्रशासन नागरिकांच्या मदतीसाठी सज्ज असून आपत्कालीन परिस्थितीत सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नुकसानाची पाहणी करतेवेळी प्रामुख्याने उपस्थित सरपंच वर्षाताई विजय पटले, उपसरपंच नंदलाल उईके, पोलीस पाटील माधव शिवणकर, पी. आर. कटरे, तलाठी दीक्षा वाकळे, वनरक्षक कुभरे, विद्युत विभागाचे लाईन मेन शशिकांत निपाने, व गावातील नागरिक उपस्थित होते.

## समाजबांधवांनी केले भोजशाला निकालाचा जल्लोष



**गोंदिया :–** मध्यप्रदेशातील धार येथील चक्रवर्ती सम्राट महाराजा भोज यांनी निर्माण केलेली पवित्र "भोजशाला' ला घेवून न्यायालयाने ऐतिहासिक निकाल देत भोजशाला हे सनातन आस्था आणि संस्कृतीचे केंद्र असल्याचे मान्य करत सत्याची पुनर्स्थापना केली आहे. या ऐतिहासिक निकालाच्या समर्थनार्थ आणि स्वागतासाठी राष्ट्रीय पंवार क्षत्रिय महासभेच्या वतीने या निर्णयाला "न्यायपर्व' आणि "धर्म विजय उत्सव' म्हणून (ता.१८) स्थानिक जयस्तंभ चौकात विजयोत्सव आतिशबाजी करून साजरा करण्यात आला. दरम्यान यावेळी मान्यवरांनी विचार व्यक्त करीत समाज एकतेसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

मध्यप्रदेशातील धार येथील चक्रवर्ती सम्राट महाराजा भोज यांनी निर्माण केलेली पवित्र "भोजशाला' ही सनातन आस्था, ज्ञान आणि माता वाग्देवीची (सरस्वती) तपोभूमी राहिली आहे. या संदर्भात मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने १५ मे २०२६ रोजी ऐतिहासिक निकाल देत भोजशाला हे सनातन आस्था आणि संस्कृतीचे केंद्र असल्याचे मान्य करत सत्याची पुनर्स्थापना केली आहे. तसेच, लंडन येथे नेलेली देवी सरस्वतीची मूर्ती परत आणून तिची भोजशालेत पुनर्स्थापना करण्याचे महत्त्वपूर्ण आदेशही न्यायालयाने दिले आहेत. या ऐतिहासिक निकालाच्या समर्थनार्थ आणि स्वागतासाठी राष्ट्रीय पंवार क्षत्रिय महासभेच्या वतीने या निर्णयाला "न्यायपर्व' आणि "धर्म विजय उत्सर्व' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याच पार्श्वभूमीवर, आज १८ मे रोजी सायंकाळी गोंदियातील जयस्तंभ चौक येथे या विजयोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून न्यायालयाच्या निकालाचे स्वागत करण्यात आले.

यावेळी पंवार प्रगतीशील मंचचे अध्यक्ष यु.टी. बिसेन, माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे, माजी जि.प.सभापती संजयसिंह टेंभरे, न.प. उपाध्यक्ष संतोष पटले, ह.भ.प. ठाकूर गुरूजी, अ?ड. टी. बी. कटरे, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश भक्तवर्ती, प्रा. किशोर भगत, केतन तुरकर, शिशिर कटरे, योगेश ठाकरे, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, पं.स.सभापती मुनेश रहांगडाले, राजकुमार पप्पू पटले, मंजुषा हरिणखेडे, भागचंद रहांगडाले, महेंद्र बिसेन, देवचंद बिसेन यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पवार प्रगतीशील मंच, शिक्षण संस्था, पंवार स्वर्गरथ समिती आणि राजाभोज उत्सव समिती आदींनी प्रयत्न केले.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**



## ढाई आखर प्रेम का...

समानता, बंधुभाव, न्याय, स्वातंत्र्य ही मूल्ये समाजाच्या आधुनिकतेची खूण मानली जाते. भारतीय समाजात एकीकडे विषम ताखोर वर्णजातपुरुषसत्ताक वर्चस्व राखण्यासाठी तत्पर असतात तर तितकाच निकराने एडीचोटीचा जोर लावणारा समतावादी प्रवाह हजारो वर्षे या देशात कायम लढत आलेला आहे. विषमतेच्या विरोधात लढणाऱ्या महामानवांनी ही मूल्ये प्राणपणाने लढून हृदयात साठवून ठेवलीत. यात संत चळवळीचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे.

एकुणच विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध उभे ठाकलेले वेगवेगळ्या कालखंडातील विविध लढे यथायोग्यपणे समजून घेणे गरजेचे ठरते. त्यांची वैचारिक भूमिका, प्रबोधनाची कार्यपद्धती, संप्रेषणाची साधनं आणि जनमानसावरील प्रभाव वगैरे खासियत आजही दिशादर्शक ठरणारे वाटू शकतात. संत परंपरेत संत कबीर यांनी अवघी पाखंडी व्यवस्था त्यांच्या तर्कशुद्ध विचार आणि अजोड युक्तिवादाने उलटीसुलटी करून ठेवली. संत कबीरांची साहित्यकृती म्हणजे प्रतिभा आणि पर्याय दोन्हीचा सुंदर मिलाफ होय. ते म्हणतात,

"पोथी पढ पढ जग मुआं
पंडित भया न कोय।
ढाई आखर प्रेम का
पढे सो पंडित होय ।।"

संत कबीरांचा हा दोहा अत्यंत लोकप्रिय आहे. याचा अर्थ मोठमोठी पुस्तकं वाचून कोणी ज्ञानी होत नाही तर जी व्यक्ती प्रेमाचा अर्थ समजून घेते तीच खरी ज्ञानी होय. माणसाने माणसावर प्रेम करणे हाच खरा धर्म आहे. मोठमोठी पुस्तकं – ग्रंथ वाचून शास्त्र वाचून कित्येक लोक मृत्यू पावले. परंतु खरा ज्ञानी कोणी होऊ शकला नाही. जी व्यक्ती प्रेमाचे दोन शब्द समजून घेते अर्थात मानवता आणि ईश्वर यांच्याबद्दल प्रेम जीवनात उतरवते तीच खरी विद्वान. केवळ पुस्तकी ज्ञान आणि पदव्या माणसाला ज्ञानी नाही बनवत. निखळ प्रेम हे करूणा, बंधुभाव आणि आत्मीयता यातच वास करत असते.

पाखंड आणि अंधविश्वास सोडून प्रेमाचा स्वीकार करा. संत कबीरांचा हा दोहा असा मौलिक संदेश देऊन अनेक अंगाने, अनेक अर्थाने मानवाला मूल्यात्मक भान देणारा आहे. विशेषतः समाजातील अभिजन वर्ग, जो अनेक क्षेत्रात पुढारपण करतो त्या समुदायाचे समाजाप्रती विशेष उत्तरदायित्त्व मानले जाते. अशा सुशिक्षित वर्गात संवेदनशीलता, नैतिकता, समाजाभिमुखता असली तरच सामाजिक जडणघडणीत दर्जात्मक फरक दिसून येईल.

या देशातील नोकरशाही अत्यंत निर्ढावलेली दिसते. सामान्य माणसाच्या हालअपेष्टांची जंत्री लांबचलांब दिसते. भारतीय संविधानातील बंधुभावाचा व्यवहार सांभाळला गेला तर भ्रष्टाचार, लाचलुचपत, काळाबाजार, दलाली या कलंकातून नोकरशाही मुक्त होईल.आजही झापडबंद शिक्षित अर्थातच पोथीनिष्ठ समाजाची अवस्था अतिशय वाईट आहे. शिकलेला माणूस, अपवाद वगळता, सामान्य कष्टकरी माणसाचा तिटकारा आणि त्याच्या कष्टाची अवहेलना उघड्या डोळ्यांनी बघत असतो. सामान्य माणसाचे शोषण करणाऱ्या दांभिक आणि अंधश्रद्धाळू शोषकांच्या बाजूने हुजरेगिरी करून आपले हितसंबंध सुरक्षित ठेऊन आपला पोकळ मोठेपणा मिरवत असतो. कित्येक महाशय तर बुवा बापू साधू साध्वी यांच्या वलयात आपली दांभिक सात्विकता भासवण्याचा आटापिटा करत असतात. कुणी यालाच व्यवहार चातुर्य देखील म्हणतात. शिक्षण घेऊन मिळवलेल्या ज्ञानाचा कुठे ताळमेळ तरी बसतो का? भोळा भाबडा अल्पमती समुदाय तर निर्जीव मुर्त्या, तसबीरी, बेजान वस्तूंवर त्यांचा अपार लोभ आणि त्यासाठी कर्मकांड पूजा, अर्चा आणि आरत्या ओवाळत बसतात. तर श्रम करणाऱ्या, आपल्या पोटाला जे अन्न मिळते त्या अन्नदात्याबद्दल कणव नाही. आपल्या गरजा पूर्ण करणाऱ्या अत्यंत जवळच्या कौटुंबिक व्यक्तिबद्दल अनाठायी अपेक्षा पूर्ण होत नाही म्हणून शिव्याशाप आणि अवहेलना करणे या दुष्चक्रात अडकलेला असतो. तेच मानवाच्या दुःखाचे खरे कारण ठरत आहे. आभासी सुखात रममान होऊन मानवी नात्यातून, संबंधातून, व्यवहारातून मिळणाऱ्या सुखाला पारखा होत चाललेला माणूस शिकला तरी प्रेमाला विन्मुख झालेला असतो. हाच या दोह्याचा अर्थ आहे.

खरं म्हणजे पुस्तकासारखा सच्चा मित्र नाही. पुस्तकं, ग्रंथ हे ज्ञानाचे भंडार होय. संत कबीर मात्र आपल्या प्रतिभासंपन्न दोह्यांच्या माध्यमातून, माणसाबद्दल प्रेम नसणाऱ्या पोथीनिष्ठ पोंगापंडितांचे असे वाभाडे काढतात. तर त्यांना गुरू मानणारे,डॉ.आंबेडकर पुस्तकांसाठी स्वतंत्र घर उभे करतात. महात्मा फुले तर अखंडातून म्हणतात,

"थोडे दिन तरी मद्य वर्ज्य करा,
तोचि पैसा भरा ग्रंथासाठी"

असा ग्रंथमहिमा प्रतिपादन करतात. विद्येच्या क्षेत्रात पुस्तकांचे महत्त्व आजच्या काळात सर्वमान्य आहे. पण स्त्रिशुद्रातिशुद्रांना धर्मसूत्रे ज्ञानबंदी करून याच ज्ञानभंडारापासून हजारो वर्षे दूर लोटतात, आणि आम्हीच विशिष्ट वर्णाचे लोक ज्ञानव्यवहाराचे ठेकेदार आहोत, अशा गमजा मारतात. त्यांचे ज्ञान, पांडित्य कुचकामी असून मानवाच्या सामाजिक उन्नयनाचा लवलेशदेखील सापडत नाही तेव्हा असे पोथीनिष्ठ ज्ञान, आणि ज्ञान्याचे पांडित्य कवडीमोल ठरते.

संत कबीरांची वाणी मानवी संबंध प्रेमानेच दृढ होतात याचा विश्वास देतात. पोथीनिष्ठ पांडित्याऐवजी प्रेमपूर्वक व्यवहार हाच मानवाच्या सुखाचा आधार आहे. आणि हेच तत्व वारकरी चळवळीचे राहिले आहे. मानवनिर्मित कृत्रिम जातीभेद, स्त्री–पुरुष भेदाभेद, अस्पृश्यता दूर करून मानवतावादी धर्माची शिकवण देत विषम व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारत अठरापगड जातीचे संत प्रबोधनवारीत पुढे आले. सर्वांना माणसावर माणसाने प्रेम करणे हाच धर्म वाटत होता. हाच धर्म सर्वसामान्य जनतेच्या पचनी पडणारा आहे. पोथीनिष्ठ कर्मकांड करणाऱ्या असंवेदनशील मतलबी धर्ममार्तंडांसमोर मोठे आव्हान उभे राहिले.

**अनुज हुलके**

# तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींनी “माझे गाव आरोग्य संपन्न गाव” मोहिमेला यशस्वी करावे-देवरे

## “माझे गाव आरोग्य संपन्न गाव’ मोहिमेसाठी तालुका स्तरीय समन्वय समितीची सभा संपन्न



**गोंदिया:-** ”माझे गाव आरोग्य संपन्न गाव’ मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर या समितीच्या माध्यमातून शासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय साधून ग्रामीण भागातील आरोग्य सुधारण्यावर भर देत ग्रामीण भागातील गावांना आरोग्य संपन्न बनविण्याकरीता सर्वांनी नियोजनबध्द काम करावे अशा सुचना समितीचे अध्यक्ष व गोंदिया पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जितेंद्र देवरे यांनी दिल्या. ते महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य उंचावण्यासाठी ङ्गमाझे गाव आरोग्य संपन्न गावङ्ख या विशेष मोहीमेच्या गोंदिया तालुकास्तरीय समितीच्या समन्वय समिती सभेत १४ मे रोजी बोलत होते.

सभेत जिल्हा परिषद क्षेत्रनिहाय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय समित्या तयार करुन अभियानाच्या अमंलबजावणीकरीता संबधित क्षेत्रातंर्गत येत असलेल्या गावातील प्रतिष्ठित नागरिक,सेवानिवृत्त अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार,स्वयंसेवी संस्था प्रतिनिधीसोबत समन्वय कसे करता येईल यावर गटविकास अधिकारी देवरे यांनी मार्गदर्शन केले.सभेला ?तालुका आरोग्य अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव डॉ. निलेश जाधव,डॉ विलास येडे, डॉ पायल रहांगडाले, डॉ शुभम गौत्तम, डॉ मौजे, डॉ अंकुश मेश्राम, डॉ कल्याणी गोतमारे प्रा आ केंद्र भानपुर, दवानिवाडा, एकोडी, दासगाव, काटी, रावणवाडी, मोरवाही, खामरी, कामठा येथील वैद्यकीय अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प १ व २, विस्तार अधिकारी पंचायत,पत्रकार प्रतिनिधी खेमेंद्र कटरे, आरोग्य, दृष्टी सामाजिक संस्था प्रतिनिधी,पंचायत समिती गोंदिया कार्यालयातील सबंधित कर्मचारी सर्व कर्मचारी उपस्थित होते.

गावागावात आरोग्याबाबत जनजागृती करणे आणि नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देऊन गावे खऱ्या अर्थाने “आरोग्य संपन्न’ करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. सभेत मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करायच्या सूक्ष्म नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.सोबतच तालुक्यातील मोठ्या आणि शासकीय योजनांच्या स्पर्धेत असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयामध्ये तालुकास्तरीय समितीच्या बैठका आयोजित करुन त्या गावातील सहभाग वाढविण्याकरीता प्रोत्साहित करण्याच्या हेतून नियोजन करण्याच्या सुचना यावेळी गटविकास अधिकारी देवरे यांनी दिले.

तालुका वैद्यकीय अधिकारी व समितीचे सदस्य सचिव डॉ. निलेश जाधव यांनी नागरिकांचे आरोग्य सुधारणे व आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून बालमृत्यू दर, माता मृत्यू दर, कुपोषण, कृष्ठरोगाचे दुरीकरण करणे, क्षयरोगाचे दुरीकरण करणे करीता “माझं गाव आरोग्य संपन्न गाव”,मोहीम एप्रिल २०२६ पासून वर्षभर राबविण्यात येणार आहे .तसेच मोहिमेची तांत्रिक बाजू,शासन निर्णयाची माहिती देत तालुक्यातील ११० ग्रामपंचायती या मोहिमेत सहभागी झाल्याचे सांगितले.तसेच १ एप्रिल रोजी ११० ग्रामपंचायतीनी विशेष ग्रामसभा आयोजित करुन नागरिकांपर्यंत माहिती पोचवल्याचेही सांगितले.

# “लॉयड्स’ने पटकावले ब्रँड परिवर्तनातील तीन पुरस्कार

**गडचिरोली :-** जिल्ह्याला औद्योगिक नकाशावर आणणाऱ्या लॉयड्स मेटल्स अँन्ड एनर्जी लि. आणि त्याअंतर्गत लॉयड्स इन्फिनिट फाऊंडेशनला ईटी ब्रँड संदर्भातील तीन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. ही तिहेरी कामगिरी या कंपनीसाठी अभिमानास्पद ठरली आहे.

२०२६ च्या ईटी ब्रँड बदलासंदर्भातील या पुरस्कारांमध्ये सस्टेनेबल स्लरी पाईपलाईन लॉजिस्टिक्ससाठी कंपनीला सुवर्ण पुरस्कार, तर परिवर्तनकारी एचआर उपक्रमांसह समावेशक ग्रामीण विकासात्मक उपक्रमांसाठी रौप्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाश्वत संचालन, नाविन्यपूर्ण कठ उपक्रम आणि समावेशक समुदाय विकासासाठी हे तीन प्रतिष्ठित सन्मान प्राप्त झाले.

लॉयड्स मेटल्सला ला सर्वाधिक क्रांतीकारी पुरवठा साखळी आणि लॉजिस्टिक्स या श्रेणीत त्यांच्या अग्रगण्य आयर ओर स्लरी पाईपलाईन प्रकल्पासाठी सुवर्ण पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा प्रकल्प भारतातील खनिज वाहतुकीला अधिक शाश्वत आणि आधुनिक स्वरूप देत आहे. या उपक्रमामुळे इंधन वापर आणि कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट झाली असून लोखंड धातूची अधिक सुरक्षित, जलद आणि पर्यावरणपूरक वाहतूक शक्य झाली आहे.




याशिवाय लॉयड्सच्या कोनसरी युनिटला सर्वाधिक परिवर्तनशिल एचआर टिम म्हणून गौरविण्यात आले. कर्मचारी कल्याण, कौशल्य विकास, कार्यस्थळी समावेशकता आणि डिजिटल एचआर परिवर्तनावर आधारित प्रगत आणि कर्मचारी केंद्रित एचआर उपक्रमांसाठी हा रौप्य पुरस्कार देण्यात आला. हा सन्मान त्यांच्या प्रभावी व्हिलेज ऑपरेटिंग सिस्टिम (तजड) या उपक्रमासाठी प्रदान करण्यात आला, ज्याचा उद्देश तंत्रज्ञान-सक्षम ग्रामीण परिवर्तन, सर्वसमावेशकता आणि ग्रामीण विकासाला चालना देणे हा आहे.

**टिम लॉयड्सचे समर्पण आणि एकत्रित प्रयत्न**

यासंदर्भात एलएमईएलचे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरन म्हणाले, ङ्गहे सन्मान टिम लॉयड्सच्या शाश्वत विकास, नाविन्य, समावेशक एचआर पद्धती आणि अर्थपूर्ण सामाजिक परिवर्तनासाठी असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहेत. स्लरी पाईपलाईनद्वारे भविष्योन्मुख पायाभूत सुविधा उभारण्यापासून लोककेंद्रित कार्यसंस्कृती निर्माण करण्यापर्यंत आणि गडचिरोलीतील समुदायांना सक्षम करण्यापर्यंत, आमची दृष्टी नेहमीच जबाबदार आणि सर्वसमावेशक विकासावर आधारित राहिली आहे. या यशामागील प्रत्येक टिम लॉयड्स सदस्याच्या समर्पण आणि एकत्रित प्रयत्नांसाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.

# आमगाव येथील बिडी कामगार दवाखाना बंद करण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध

**आमगाव:-** गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बिडी उद्योगावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. बिडी तयार करणाऱ्या कामगारांच्या आरोग्य सुविधांसाठी केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत विविध ठिकाणी बिडी कामगार दवाखाने सुरू करण्यात आले आहेत. मात्र, आमगाव येथील बिडी कामगार दवाखाना बंद करण्याच्या निर्णयामुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमगाव येथील हा दवाखाना चार तालुक्यांतील बिडी कामगार आणि रुग्णांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र म्हणून कार्यरत आहे. दररोज सुमारे २० ते २५ रुग्ण येथे उपचारासाठी येत असतात. विशेष म्हणजे, या दवाखान्यामार्फत बिडी कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्तीचाही लाभ दिला जातो. आमगाव येथील दवाखान्यात सुमारे ५ हजार ऑनलाइन नोंदणीकृत बिडी कामगार आहेत तर जवळपास १२ हजार कामगार अद्याप ऑनलाइन प्रक्रियेपासून वंचित आहेत.अशा परिस्थितीत दवाखाना बंद झाल्यास हजारो कामगारांना आरोग्य सुविधांपासून दूर जावे लागेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.



### दवाखाना बंद होऊ देणार नाही-दुष्यंत किरसान

**यावेळी खा. डॉ. नामदेव किरसान यांचे प्रतिनिधी दुष्यंत किरसान तसेच आमदार प्रतिनिधी मनोज सोमवंशी, राम चक्रवती यांनी बिडी कामगारांची भेट घेऊन हा दवाखाना बंद होणार नाही. यासाठी पाठपुरावा करण्यासह संबंधित मंत्र्यांना भेटून दवाखाना स्थलांतरित करण्याचे आदेश रद्द करण्याचे आश्वासन दिले. यावेळी मोठ्या संख्येने बिडी कामगार व नागरिक उपस्थित होते.**

कामगारांच्या मते, हा दवाखाना बंद करून सेवा गोंदिया येथे हलवण्यात आल्यास ग्रामीण भागातील गरीब कामगारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत दवाखाना बंद होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका बिडी कामगारांनी घेतली आहे. तसेच शासनाने निर्णय मागे घेतला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही कामगारांनी दिला आहे. दरम्यान, बिडी कामगारांच्या भावना लक्षात घेऊन केंद्र शासन या प्रकरणात काय निर्णय घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सर्वांगीण विकासाच्या दिशेने शहराची अभूतपूर्व वाटचाल-आ.बडोले

## नागरी सेवा व सुविधा योजनेअंतर्गत ८.४० कोटी रुपयांच्या विकास कामांचे आ.बडोले यांनी केले भूमिपूजन

**अर्जुन मोरगाव :-** शहराच्या सर्वांगीण विकासाचा रोज एक नवा अध्याय अर्जुनी नगरपंचायत लिहीत आहे.शहराला सर्वांग सुंदर करण्यासाठी नगरसेवकांनी वज्रमुठ बांधली आहे.मूलभूत पायाभूत सुविधांनी सज्ज सुंदर नगरासाठी नगरसेवकांचा राजकीय एकोपा इतरांना मोलाचा संदेश देणारा आहे. राज्याचे महायुती सरकार भरघोस निधी उपलब्ध करून देत आहे. यामुळे सर्व सहज शक्य होत आहे. मी या भागाचा आमदार म्हणून सदैव आपल्या पाठीशी आहे.नगर विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही.लवकरच पाणीपुरवठा योजना आणि प्रशासकीय इमारतीचा प्रश्न मार्गी लागेल.स्वच्छ रस्ते, सांडपाण्याची सोय, विद्युत व्यवस्था, पिण्याचे स्वच्छ पाणी, सौंदर्यकरणाची प्रस्तावित कामे म्हणजे शहर सर्वांगीण विकासाच्या दिशेने अभूतपूर्व वाटचाल करीत असल्याचे धोतक असल्याचे प्रतिपादन आ. इंजि.राजकुमार बडोले यांनी केले.

ते नागरी सेवा व सुविधा योजनेअंतर्गत ८.४० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे. भूमिपूजक म्हणून बोलत होते.नगराध्यक्ष मंजुषा बारसागडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या भूमिपूजन सोहळ्यास उपाध्यक्ष ललिता टेंभरे, सभापती यशकुमार सहारे, दानेश साखरे, सपना उपवंसी, नगरसेवक संजय पवार, राधेश्याम भेंडारकर, अतुल बनसोड, सागर आरेकर, विजय कापगते, नगरसेविका ममता भय्या, इंदू लांजेवार, संध्या शहारे, शीला उईके, दिव्या पसीने, दीक्षा शहारे, सुषमा दामले आणि मुख्याधिकारी ज्ञानेश सोनवाने उपस्थित होते.




### भव्य नमो उद्यान होणार

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या जन्मदिनी गतवर्षी एक कोटी रुपयांचा नमो उद्यान मंजूर केला. शहराच्या सौंदर्यकरणात भर पडावी,नागरिकांना उद्यानाचा लाभ मिळावा या उदात्त हेतूने टीव्ही टावर परिसरात नमो उद्यान साकारला जात आहे.उत्कृष्ट उद्यानांना शासनाकडून पारितोषिक मिळणार आहे.आज आमदारांच्या हस्ते उद्यानाचे भूमिपूजन झाले.**

आ. बडोले पुढे म्हणाले, जनतेने निवडून दिलेल्या नवख्या नगरसेवकांकडून प्रत्येक प्रभागात विकासाची कामे पोहोचवून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा अविरत प्रयत्न सुरु आहे. सर्वांगीण विकासासोबत कामांचा दर्जा,गुणवत्ता उत्तम असावा याकरिता सर्वांनी सजग राहावे.मूलभूत सुविधा सोबत नागरिकांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी नगरसेवकांनी कार्य करावे तरच शहराचा सर्वांगीण विकास साध्य करता येईल असे आवाहन केले.

यावेळी नागरी सेवा व सुविधा योजना २०२४-२५ अंतर्गत ८.४० कोटीच्या विविध प्रभागात विकास कामांचे भूमिपूजन आ.राजकुमार बडोले यांच्या हस्ते करण्यात आला.सिमेंट काँक्रीट रस्ते, बंद गटारे, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक, स्वच्छता गृह,लघु पाणीपुरवठा सुविधा, वृक्ष लागवड, संरक्षण भिंती, वॉटर कुलर, सौंदर्यीकरण अश्या कामांसह एक कोटी रुपयांच्या नमो उद्यानाचा समावेश आहे. यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध होणार असून शहराच्या विकासाला गती मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंजि.निखिल बंड,प्रशासकीय अधिकारी दिलीप उईके, लेखापाल एकनाथ चव्हाण, सुमित मेश्राम, दीपक राऊत, दुर्योधन नेवारे, सुरेश बोरीकर, धनंजय काळबांधे, नयन शहरे, मिथुन कोचे,अरविंद लांजेवार यांनी सहकार्य केले.

### मल उपसा मशीनचे लोकार्पण

**शासनाने गटारांमधील मल उपसा करण्यासाठी मल उपसा मशीन उपलब्ध करून दिली.यापूर्वी नागरिकांना गटार सफाई करिता किरायाने मशीन मागवावी लागत होती. ती गैरसोय आता टळली.या मल उपसा मशीनचे आमदारांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.**

# १० एकर शेत जमिनीला मिळणार मुबलक पाणी-आमदार विनोद अग्रवाल

**गोंदिया :-** तालुक्यातील गुदमा येथील शेतकऱ्यांना मागील अनेक वर्षापासून रब्बी हंगामात सिंचनासाठी पाण्याची उपलब्ध होत नसल्याने उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या बाबीची दखल आमदार विनोद अग्रवाल यांनी गुदमा माइनरच्या माध्यमातून रब्बी हंगमातील पिकांना पाणी मिळावे यासाठी नवीन सुपर पैसेजच्या बांधकामेचे भूमिपूजन केले. यामुळे साधारण ५०० मीटर लांबीच्या माइनर अंतर्गत ९० एकर शेत जमिनीला सिंचनाची सोय होणार आहे.

गुदमा येथील जुन्या जिर्ण दगडी सुपर पैसेजच्या जागी नवीन बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. अंभोरा गावातील हा जुना दगडी सुपर पैसेज काळाच्या ओघात अत्यंत खराब आणि जीर्ण स्थितीत पोहोचला होता. यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत होती तसेच सिंचन व्यवस्थाही विस्कळीत होत होती. शेतकऱ्यांकडून नवीन, मजबूत बांधकामाची मागणी सतत होत होती. त्या तक्रारी लक्षात घेऊन नवीन सुपर पैसेज बांधकामास सुरुवात करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नवीन बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पाण्याच्या गळतीवर पूर्णपणे नियंत्रण मिळेल आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी वेळेवर व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होईल.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे नवीन बांधकाम अधिक टिकाऊ व दीर्घकाळ उपयोगी ठरेल, यासाठी संबंधित विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

या दोन्ही कामांच्या शुभारंभामुळे गुदमा, अंभोरा आणि परिसरातील शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. शेतकऱ्यांनी ही सकारात्मक पुढाकार स्वागतार्ह असल्याचे सांगत, यामुळे सिंचन व्यवस्था आणि कृषी उत्पादनात मोठा लाभहोईल अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी स्थानिक नागरिक, शेतकरी, जनप्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



# गोंदिया येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मार्ग अखेर मोकळा

**गोंदिया :-** जिल्ह्यातील एकमेव असलेले गोंदिया येथील एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय तीन वर्षांपासून बंद पडले आहे,तर दुसरे अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्याने जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नागपूर, पुणे, हैदराबाद येथे धाव घ्यावी लागत होती. मात्र, ही अडचण आता दूर होणार असून, गोंदिया येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मार्ग मोकळा झाला आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रस्ताव शासनाकडे सादर झाला असून, आता अंतिम मंजुरीची प्रक्रियेची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आ. विनोद अग्रवाल यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पत्र क्र. २/एनजीसी/ शा.अभि.महा./ गोंदिया /२०२६ दिनांक ६ मार्च २०२६ द्वारे हा प्रस्ताव मुख्य अपर सचिव, तंत्र शिक्षण - विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविला असून, त्यावर संज्ञान घेऊन पुढील मंजुरी प्रक्रिया सुरू केली आहे. आ. विनोद अग्रवाल यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आता जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे इंजिनिअर होण्याचे स्वप्न त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यातच पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यामुळे विद्यार्थी, पालक आणि जिल्हावासीयांत उत्साहाचे वातावरण आहे. आतापर्यंत उच्च तांत्रिक शिक्षणासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नागपूर, पुणे, मुंबई किंवा इतर मोठ्या शहरांकडे जावे लागत होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी हा प्रवास अत्यंत कठीण ठरत होता. परंतु, आता गोंदिया येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होणार असल्याने हजारो विद्यार्थ्यांना आपल्या जिल्ह्यातच अत्याधुनिक तांत्रिक शिक्षण मिळण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. यामुळे जिल्ह्यातील युतक आता इंजिनिअरिंग, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवे भविष्य घडवू शकतील. हे महाविद्यालय केवळ एक शैक्षणिक संस्था नसून, गोंदिया जिल्ह्याच्या उज्ज्वल भविष्यासाठीची भक्कम पायाभरणी ठरेल. आधुनिक सुविधा, अत्याधुनिक प्रयोगशाळा व गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे हे संस्थान आगामी काळात जिल्ह्याला नवी उंची गाठून देईल.



**या अभ्यासक्रमांचा राहणार समावेश**

प्रस्तावित शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग हे अभ्यासक्रम उपलब्ध राहणार आहेत.

# जिल्हा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे जिल्हा शिक्षक भरतीपासून वंचित

**गोंदिया :-** जिल्हा परिषद पदाधिकारी व अधिकारी यांच्या उदासीनतेमुळे जिल्ह्यातील शिक्षकांची शंभरहून अधिक पदे रिक्त असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी शिक्षक पदभरती घेण्याची मागणी शिक्षक संघटनांनी शासनाकडे केली आहे.




महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण राज्यात एकाचवेळी शिक्षक भरतीप्रक्रिया सुरुवात करण्यात आली आहे. याकरिता शासनाच्या वतीने पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक भरतीप्रक्रिया रीतसर सुरुवात करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हा परिषदेला व संस्थांना त्यांच्या आस्थापनेंतर्गत रिक्त पदे किती याची नोंद पोर्टलवर ३१ मे २०२६ पूर्वी अद्ययावत करणे आवश्यक आहे. परंतु, गोंदिया परिषदेचे पदाधिकारी व शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी यांची याबाबत उदासीनता दिसून येत आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात शिक्षकाची अनेक पदे रिक्त आहेत.

एवढेच नव्हे तर दर महिन्यांना अनेक शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत. याकरिता गोंदिया जिल्ह्यातील रिक्त पदांची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाला पवित्र पोर्टलवर अपलोड करावयाची आहे. परंतु तत्पूर्वी जिल्हा परिषद प्रशासनाला जिल्ह्यातील विविध पर्यवेक्षीय यंत्रणा व वरिष्ठ पदांवर कार्यरत शिक्षकांमधून पदोन्नती घेणे गरजेचे आहे. सद्यःस्थितीत गोंदिया जिल्ह्यात शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, उच्चश्रेणी मुख्याध्यापक पदवीधर शिक्षक यांची १००हून अधिक पदे रिक्त आहेत. ही पदे ३१ मे २०२६ पूर्वी पदोन्नतीने भरली न गेल्यामुळे तेवढीच शिक्षकांची तेवढी पदे रिक्त होणार नाहीत. पर्यायाने गोंदिया जिल्ह्यातील रिक्त शिक्षकांची पदे ही कमी दाखवली जातील आणि त्यामुळे अनेक वर्षापर्यंत गोंदिया जिल्ह्याला शिक्षकांच्या सतत तुटवडा भासणार आहे. जर ही पदोन्नती प्रक्रिया ३१ मे पूर्वी जिल्हा परिषद प्रशासनाने राबविली तर कार्यरत शिक्षकांची वरिष्ठ पदांवर पदोन्नती होऊन गोंदिया जिल्ह्याला अधिकाधिक नवीन शिक्षक पवित्र पोर्टल मार्फत उपलब्ध होऊ शकतात. परंतु, याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

**पदोन्नती प्रक्रिया राबवा**

विलंब होत असल्यामुळे कार्यरत शिक्षकांची तेवढीच पदे भरलेली दाखवतील ज्याचा परिणाम भविष्यात शिक्षकांची कमी पदे भरली जातील. या वस्तुस्थितीकडे जिल्हा परिषद शासन प्रशासन यांनी लक्ष देऊन गावोगावी पुरेशा प्रमाणात शिक्षक उपलब्ध होण्याकरिता कार्यरत शिक्षकांची पदोन्नती प्रक्रिया आधी राबवून अधिकाधिक रिक्त पदे पोर्टलवर नोंदवावी, जेणेकरून गोंदिया जिल्ह्याला अधिकाधिक शिक्षक पवित्र पोर्टलमार्फत मिळू शकतील, अशी मागणी गोंदिया जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटना व पालकांनी केली आहेपदोन्नती प्रक्रिया राबवा.विलंब होत असल्यामुळे कार्यरत शिक्षकांची तेवढीच पदे भरलेली दाखवतील ज्याचा परिणाम भविष्यात शिक्षकांची कमी पदे भरली जातील. या वस्तुस्थितीकडे जिल्हा परिषद शासन प्रशासन यांनी लक्ष देऊन गावोगावी पुरेशा प्रमाणात शिक्षक उपलब्ध होण्याकरिता कार्यरत शिक्षकांची पदोन्नती प्रक्रिया आधी राबवून अधिकाधिक रिक्त पदे पोर्टलवर नोंदवावी, जेणेकरून गोंदिया जिल्ह्याला अधिकाधिक शिक्षक पवित्र पोर्टलमार्फत मिळू शकतील, अशी मागणी गोंदिया जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटना व पालकांनी केली आहे


## ग्रामपंचायत कार्यालय खामखुरा
## पंचायत समिती अर्जुनी/मोर.
## ई-निविदा

निविदा क्रं.१ दिनांक:-१५/०५/२०२६

ग्रामपंचायत कार्यालय खामखुरा पंचायत समिती अर्जुनी/मोर. सदर ग्रा.पं.मध्ये सन २०२६-२७ ह्या आर्थिक वर्षात विविध विकास कामाच्या बांधकामे करण्याकरिता संबंधित साहीत्याची ई निविदा पद्धतीने निविदा मागण्यात येत आहे. तरी नोंदणीकृत कंत्राटदारांनी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक १६/०५/२०२६ पासून |
| २ | ई-निविदा अंतिम दिनांक | दिनांक २२/०५/२०२६ सायं.०५.०० वा. पर्यंत |
| ३ | ई-निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक २३/०५/२०२६ ला १२.३० वा. शक्य झाल्यास |

विस्तृत माहीती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वांना लागु राहतील.

**सरपंच**
**ग्राम पंचायत खामखुरा**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्राम पंचायत खामखुरा**

# केंद्र शासनाच्या योजनांपासून जिल्ह्यातील नागरिक वंचित राहू नये-खासदार डॉ.प्रशांत पडोळे



**गोंदिया:-** केंद्र शासनाच्या योजनांपासून जिल्ह्यातील नागरिक वंचित राहू नये, यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्नरत असावे, असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती दिशाच्या बैठकीत खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी आज दिले.

जिल्हा नियोजन सभागृहात दिशा समितीची बैठक पार पडली, त्यावेळी खासदार श्री. पडोळे बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, माजी आमदार दिलीप बंसोड, अतिरीक्त मुख्यकार्यकारी अधिकारी तानाजी सावंत, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग मंचावर उपस्थित होते. यासह पंचायत समितीचे सभापती, सदस्य, ग्रामपंचायत सरपंच व सर्व विभागाचे कार्यालय प्रमुख बैठकीस उपस्थित होते.

श्री. पडोळे पुढे म्हणाले, केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ सुलभरीत्या जिल्ह्यातील सामान्य नागरिकांना मिळण्यासाठी दिशा समिती गठीत करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या वतीने वेगवेगळया योजनांची अंमलबजावणी केली जाते त्यात गती यावी, असे ते यावेळी म्हणाले.

खासदार श्री. पडोळे यांनी यावेळी, सर्वच महत्वपूर्ण योजनांचा आढावा घेतला. शेतकऱ्यांना मुख्यमंत्री कृषी वाहिनी योजनेतंर्गत मिळणाऱ्या सौर ऊर्जा पंपाची स्थिति जिह्यातील स्थिती जाणुन घेतली. जिल्ह्यातील वनक्षेत्रालगतचा काही भाग बफर झोन म्हणून सरकारने निश्चित केला असून स्थानिकांच्या पुर्नवसन करतांना शासनस्तरावरून स्थानिकांना कमी त्रास होईल, असे पहावे अशा सुचना केल्या. तसेच जिल्ह्यातील काही भागात वन्यजीव मानव संघर्षाचा त्रास स्थानिक लोकांना होत असून याबाबत यात नागरीकांचा जीवही जातो असे प्रकरणा हाताळतांना संवेदनशीलता दाखवावी असे ही श्री पडोळे म्हणाले. रानडुकर, हत्ती, माकड आणि अन्य वन्य जीवांमुळे स्थानिक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते याबाबत ही वन विभागाने योग्य ती पावले उचलावीत असे, निर्देशीत केले. यासह जिल्ह्यात वनतारा सारखा एखादा प्रकल्प राबविण्यात यावा, यामुळे पर्यटन आणि रोजगारही वाढेल अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

जिल्हयातील क्रिडा विभागाकडे अपुरे मनुष्य बळ असल्याने कामांची प्रलंबितता वाढली आहे, याबाबत तातडीने उपाययोजना करण्याबाबतच्या सुचना दिल्या. केंद्रातील अमृत तलाव योजनेचा लाभ संबधित विभागाने उचलावा यात केंद्राकडून निधी दिला जात असल्याने त्याचा लाभ नागरीकांना देण्यात यावा.

ज्या कलावंतांनी आजीवन कलेची सेवा केली आहे त्यांच्यासाठी केंद्र शासनाची योजना असून त्याचा लाभ जिल्हयांतील कलावंतांना मिळावा, यासदंर्भात लवकरच बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य विभागाविषयी बोलतांना श्री. पडोळे यांनी जिल्ह्यातील ऑक्सिजन प्लांट विषयी माहिती जाणून घेतली. शासकीय रूग्णालयातील अडचणी जाणून घेतल्या. आयुष्यमान भारत आणि महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे निर्देश यावेळी दिले.

जिल्ह्यातील बहुसंख्य भाग आदिवासी लोकांचा असल्याने त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होणार नाही याबाबतच्या सूचना केल्या. रोजगार हमी योजनेचा थकीत निधी जिल्ह्यातील कुशल व अकुशल कामगारांना लवकरात लवकर मिळावा,रोजगार हमीची कामे मिळत नसल्यास त्याकाळात नियमाप्रमाणे बेरोजगार भत्ता देण्याबाबतचा विचार व्हावा.

शेतकऱ्यांना खतासह कंपन्यांकडून अन्यबाबी आवश्यकता नसतानाही पुरविल्या जातात, याचा नाहक ताण शेतकऱ्यांचा होत असतो. याबाबत पुरवठादार कंपन्यांवर कारवाई करण्याचे निर्देश श्री पडोळे यांनी बैठकीत दिले.

शालेय पोषण आहारा अंतर्गत देण्यात येणारा आहार चांगल्या दर्जाचा असावा याची खातरजमा शिक्षण विभागाकडून व्हावी, यासह सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असावेत, कुठल्याही कारणाने विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद पडू नये याकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण याची माहिती यावेळी खासदार पडोळे यांनी जाणून घेतली.

पणन विभागातर्फे धान खरेदी होत असून त्यामध्ये शेतकऱ्यांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी त्वरित करावेत. यावर्षी जिल्हाला रबीसाठी मिळालेल्या उद्दीष्टात वाढ करण्यात यावी. तसेच मागील वर्षीच्या धान अद्यापही गोदामात आहे. त्याबद्दलचा शेतकऱ्यांना मोबदला देण्यासंदर्भात पाठपूरावा करण्याचे निर्देश बैठकीत दिले.

उमेदतर्फे जिल्ह्यातील महिलांना सक्षम करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती श्री पडोळे यांनी घेतील. यासह सर्वच विभागाबद्दलची माहिती त्यांनी यावेळी जाणून घेऊन जिल्हयातील शेतकरी, महिला, बालक, विद्यार्थी, तरुण, वृद्ध, सर्वच स्तरातील नागरीकांच्या येणाऱ्या समस्यांना सोडविण्यात दिरंगाई करू नये असे आवाहन खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी यावेळी केल्या.

# ओबीसी जनगणना व आरक्षण प्रश्नांवर बहुजन समाज पक्षाचा एल्गार

### गोंदियात २६ मे रोजी "जनआक्रोश आंदोलन'; सामाजिक न्यायासाठी विविध मागण्यांचा पुन्हा उद्यार



**गोंदिया :-** सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि आरक्षणाच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा बहुजन समाज पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून, ओबीसी जनगणना, अनुसूचित जाती-जमाती आरक्षणातील उपवर्गीकरण, खाजगी क्षेत्रातील आरक्षण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गोंदिया येथे व्यापक जनआक्रोश आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. "बहुजन भाई जागे होतील: चोर आणि दरोडेखोर पळून जातील:" अशा घोषणांनी सजलेल्या या आंदोलनाच्या पत्रिकेमुळे जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे.

बहुजन समाज पक्षाच्या गोंदिया जिल्हा युनिटच्या वतीने मंगळवार, दि. २६ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत तहसील कार्यालय संकुल, गोंदिया येथे हे आंदोलन होणार आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री भगिनी मायावती यांच्या विचारधारेतून प्रेरित या आंदोलनाला ङ्कसंविधान रक्षण आणि सामाजिक हक्कांची लढाईङ्क असे स्वरूप देण्यात आले आहे.

आंदोलनाच्या पत्रिकेत ओबीसी जनगणना तात्काळ लागू करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली असून, अन्यथा जनगणनेलाच विरोध करण्याचा इशारा देण्यात आला आहे. अनुसूचित जाती व जमाती आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी मागणीही ठामपणे पुढे करण्यात आली आहे. तसेच खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करणे, पदोन्नतीमधील आरक्षण त्वरित सुरू करणे, शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा करणे आणि जिल्ह्यात वाढत्या खाण माफि यांच्या मनमानीला लगाम घालणे, या मागण्याही आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहेत.

बहुजन चळवळीतील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी या आंदोलनात सहभागी होणार असून, समाजातील वंचित, शोषित आणि मागास घटकांचा आवाज बुलंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनसमर्थन मिळवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. "जे आपल्या समाजासाठी आवाज उठवत नाहीत, ते आपल्या समाजाचे मृतदेह उचलतात," हा गुरु नानक साहेबांचा विचार पत्रिकेत ठळकपणे मांडण्यात आला असून, त्यातून आंदोलनाचा भावनिक आणि वैचारिक सूर स्पष्ट होत आहे.

या आंदोलनासाठी विशेष अतिथी म्हणून माननीय ॲड. सुनील डोंगरे आणि माननीय डॉ. मोहन रायकवार उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विदर्भातील विविध विधानसभा समित्या, महिला विभाग, शहर समित्या आणि बसपाचे विविध पदाधिकारी या आंदोलनाच्या नियोजनात सक्रिय असल्याचे दिसून येते. अर्जुनी-मोरगाव, तिरोडा-गोरेगाव, आमगाव-देवरी तसेच गोंदिया विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.राजकीय पटलावर सामाजिक न्यायाचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न या आंदोलनातून दिसून येत आहे. आरक्षण, जनगणना आणि संविधानिक अधिकारांभोवती फिरणाऱ्या या आंदोलनामुळे आगामी काळात जिल्ह्यातील सामाजिक समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बहुजन समाज पक्षाने दिलेल्या या हाकेला किती प्रतिसाद मिळतो, याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# दहा वर्षांच्या मेहनतीनंतर पालटले मुरदोली गेटचे रूप



**गोंदिया :-** पूर्व विदर्भातील मुरदोली हे नाव आज वन्यजीव संवर्धनाच्या यशस्वी उदाहरणांपैकी एक झाले आहे. एकेकाळी मानव-वन्यजीव संघर्षाने त्रस्त असलेला हा भाग आता वाघदर्शन, यशस्वी प्रजनन आणि उदयोन्मुख सफारीसाठी प्रसिद्ध आहे. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प (एनएनटीआर) कॉरिडॉरमधील मुरदोली दहा वर्षांपूर्वी अधिवास नाश, पाण्याची कमतरता, वणवा, शिकारी आणि संघर्षामुळे संकटात होता. पण दशकभराच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी हे जंगल वाघांच्या साम्राज्यात बदलले.

हा बदल रात्रभरात घडला नाही. एसईडब्ल्यूए संस्थेचे स्वयंसेवक आणि वनविभागाच्या समर्पित अधिकाऱ्यांनी वैज्ञानिक निरीक्षण, ट्रॅप कॅमेरा मॉनिटरिंग, जनजागृती आणि अधिवास व्यवस्थापनावर अविरत काम केले. स्वयंसेवक सावन बहेकार, शशांक लाडेकर, कन्हैया उडापुरे, दिलेश कुशराम, सुशील बहेकार यांनी जंगलातील वाघांचे वर्चस्व, संघर्ष आणि बदल जवळून नोंदवले. तत्कालीन उपवनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, प्रमेदकुमार पंचभाई, वनपरिक्षेत्र अधिकारी विजय कदम, प्रवीण साठवणे, वनरक्षक मनोज सहारे, संतोष कटरे आणि वनमजूर खुशाल चौधरी यांनी संरक्षणाचे कंबर कसली. एफडीसीएमचे मूलचंद नंदेश्वर यांचाही उल्लेखनीय वाटा.

## अशी वाढली वाघांची संख्या

**सुरुवातीला नवेगावचा नर वाघ टी-७मुरदोलीत येत असे. नंतर नागझिराचा टी-९ने वर्चस्व प्रस्थापित केले. टी-१४ वाघिणीने येथे पहिले बछडे जन्माला घातले, ज्यामुळे अधिवास पुनरुज्जीवनाला चालना मिळाली. तिने १२ बछड्यांचे योगदान दिले, पण रस्ते अपघात आणि रेल्वे धडकेत दोन बछडे गमावले. सीएफआर समित्यांच्या सहभागाने स्थानिक ग्रामस्थ जंगल संरक्षणात सक्रिय झाले. जांभळी नर वाघ मुरदोलीवर राज्य करतोय.**

## सफारीचे नवे केंद्र

**आता एका सफारीत चार-पाच वाघांचे दर्शन होतेय. मुरदोली हे एनएनटीआर बफर झोनचे यशस्वी प्रतीक आणि उदयोन्मुख सफारी गेट बनले. संवर्धन अभ्यासक म्हणतात ही केवळ वाघांची नाही, तर समर्पण आणि सामूहिक प्रयत्नांची गाथा आहे. दीर्घकालीन संरक्षणाने जंगलाचे भविष्य कसे बदलू शकते, याचे जिवंत उदाहरण आहे.**

# शाळा व्यवस्थापन समितीला अधिकार

### एक जोड बूट व दोन जोड पायमोजेही मिळणार

**समग्र शिक्षाअंतर्गत विद्यार्थ्यांना दोन जोड गणवेश वितरित केले जात असतानाच एक जोड बूट व दोन जोड पायमोजे सुद्धा दिले जाणार आहेत. गणवेश सोबतच हे साहित्य मिळणार असल्याने विद्यार्थ्यांची मज्जा होणार असतानाच त्यांच्या पालकांचा खर्चही वाचणार आहे.**

### सूचनांनी वाढविले शाळा समितीचे टेन्शन

**परिषदेने दिलेल्या सूचनांनुसार, गणवेशाचे कापड चांगल्या दर्जाचे, शरीराला इजा न करणारे तसेच १०० टक्के पॉलिस्टरचे नसावे. तर शिलाई पक्क्या दौऱ्याची असून, शिलाई निघाल्यास, कापड फाटल्यास अथवा कोणतीही तक्रार आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी समितीची राहणार आहे. विशेष म्हणजे, समितीला प्रति विद्यार्थी दोन जोड गणवेशासाठी ६०० रुपये दिले जाणार आहेत. आता ६०० रुपये दराने गणवेश पुरवठा करावयाचा असतानाच सर्व सूचनांचे पालन करावयाचे असल्याने समितीचे टेन्शन वाढले आहे**

**गोंदिया :-** समग्र शिक्षाअंतर्गत विद्यार्थ्यांना दोन जोड गणवेश दिले जात असून, त्यानुसार यंदाही गणवेश वितरण केले जाणार आहेत. मात्र, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून गणवेश पुरवठ्याचा प्रयोग फसल्याने गणवेशांबाबतचे यंदा सर्व अधिकारी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितींना देण्यात आले आहेत.शाळा व्यवस्थापन समितींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दोन जोड गणवेश दिले जाणार आहेत. अशात केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेंतर्गत गणवेशाचा रंग व रचना संबंधित शाळा व्यवस्थापन समितीच निश्चित करणार. तर ज्या शाळांमध्ये स्काउट-गाइड हा विषय आहे, अशा शाळांना नियमित एका गणवेशाची रंगसंगती शाळा स्तरावर निश्चित करावयाची आहे. तर दुसरा गणवेश स्काउट-गाइड संस्थेने निश्चित केलेल्या रंगसंगतीप्रमाणे खरेदी करण्याचे अधिकारही शाळा व्यवस्थापन समितीनाच आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद प्रकल्प संचालकांकडून सूचनांचे पत्र जिल्ह्यांना धडकले आहे. यामुळे यंदा शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळतात का, याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत.

समग्र शिक्षाअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व मुली, अनु जाती-जमाती मुले तसेच दारिद्रयरेषेखालील पालकांच्या



मुलांना दोन जोड गणवेश वाटप केले जातात. यंदाही विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी परिषदेकडून गणवेश पुरवठा करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाला जबाबदारी देण्यात आली होती. मात्र, परिषदेचा तो प्रयोग फसला होता.

अशात यंदा तसा काही घडू नये म्हणून परिषदेकडून यंदा शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचे अधिकारी शाळा व्यवस्थापन समितींनाच देण्यात आले आहे. गणवेश वाटपाला घेऊन प्रकल्प संचालकांकडून सूचनांचे पत्रही सर्व जिल्ह्यांना पाठविण्यात आल्याने त्यानुसार तयारी केली जात आहे.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना दोन जोड गणवेश दिले जात असून, त्यासाठी प्रती ३०० रुपयांची तरतूद आहे. म्हणजेच, दोन जोड गणवेशांसाठी एकूण ६०० रुपये प्रति विद्यार्थी शाळा व्यवस्थापन समितींना दिले जाणार आहे. परिणामी, गणवेश नियोजनाला घेऊन आता शाळा व्यवस्थापन समितींची कसरत सुरू होणार आहे.

# आदिवासी वित्त व विकास विभागाच्या अप्पर सचिवांकडून "गोमती शेतकरी उत्पादक संस्थे'च्या कामकाजाची पाहणी



**देवरी:-** तालुक्यातील हेरपार (धमदीटोला) येथील गोमती आदिवासी शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्यादित या संस्थेला आदिवासी वित्त व विकास विभागाचे अप्पर सचिव विजय वाघमारे (भा.प्र.से.) यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थेच्या सुरू असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करून कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

या महत्वपूर्ण भेटीदरम्यान त्यांच्यासोबत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरीचे प्रकल्प अधिकारी उमेश काशीद, शबरी आदिवासी वित्त विभागाचे प्रकल्प समन्वयक प्रफुल्ल पाटील तसेच विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.विजय वाघमारे यांनी संस्थेच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची सविस्तर माहिती घेतली.

उत्पादक संस्थेचा कारभार, शेतकऱ्यांचा सहभाग आणि उत्पादित मालाचे विपणन यावर त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. "ग्रामीण भागातील आदिवासी शेतकऱ्यांना संघटित करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे ही काळाची गरज आहे," असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.या प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, शेतकरी प्रतिनिधी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# २० मे रोजी औषध विक्रेत्यांनी पुकारल्स भारत बंद गोंदियात आपत्कालीन औषध सेवा उपलब्ध

**गोंदिया:-** ऑल इंडिया ऑरगनायझेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट या संघटनेने राज्यात व देशात कार्यरत असलेल्या ऑनलाईन इंटरनेट फार्मसीच्या विरोधात व इतर मुद्याबाबत, बुधवार दिनांक २०/०५/२०२६ रोजी संपूर्ण भारतभर किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांनी औषधी व्यवसाय बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे.

या पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्ह्यातील रुग्णांची गैरसोय होऊ नये आणि अत्यावश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासन (म.रा.), गोंदिया व गोंदिया जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे संयुक्त पावले उचलण्यात आली आहेत.

बंदच्या काळात संपूर्ण जिल्ह्यात तातडीने औषधे उपलब्ध करून देण्यासाठी तालुकावार इमर्जन्सी करीता औषध दुकान चे मालक/फार्मासिस्टची यादी त्यांच्या मोबाईल नंबरसह खालील प्रमाणे आहे. नागरिकांना आणीबाणीच्या प्रसंगी औषधांची आवश्यकता भासल्यास त्यांनी खालील तालुकानिहाय क्षेत्रांमधील संबंधित औषध दुकानाच्या मालक / रजिस्टर्ड फार्मासिस्ट आणि त्यांच्या दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा.

# कन्हारटोलीतील फ्लोराईडयुक्त पाण्याची जिल्हा परिषद प्रशासनाने घेतली दखल

**गोरेगाव :-** तालुक्यातील कन्हारटोली (पिंडकेपार) गावातील जलस्रोतात फ्लोराईडयुक्त पाणी गावकऱ्यांना प्यावे लागत असल्याची माहिती मिळताच जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांच्या सूचनेनुसार ११ मे रोजी आरोग्य विभागाचे पथक कन्हारटोली (पिंडकेपार) गावात पोहोचले. फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे आरोग्यावर होणारे परिणाम व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजनेविषयी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

पथकामध्ये जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, गोरेगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, कुऱ्हाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका हेडावू, उपकेंद्र पिंडकेपार समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. निधी चौधरी, आरोग्य सहायक रवी पटले, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे पाणी गुणवता तज्ज्ञ मुकेश त्रिपाठी यांच्यासह ग्राम कन्हारटोली (पिंडकेपार) सरपंच योगिता शहारे, उपसरपंच भरत घासले व गावकरी उपस्थित होते.

जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल यांनी यावेळी



## फ्लोरोसिसचे परिणाम

**दंत फ्लोरोसिस : दातांवर पांढरे, पिवळे किंवा काळे डाग पडणे व दात ठिसूळ होणे.अस्थि फ्लोरोसिस (हाडांचे विकार) : सांधेदुखी, हाडे वाकडी होणे, चालण्यात अडथळे येणे आणि गंभीर प्रकरणांमध्ये पाठीच्या मणक्याला बाक येणे.**

## फ्लोरोसिस आजाराची शक्यता

**डॉ. विनोद चव्हाण यांनी यावेळी हे पाणी पिण्यायोग्य नसल्याने त्या ठिकाणी ग्रामपंचायतीने तिथे पाणी पिण्यासाठी वापर करू नये, असे फलक लावण्याची सूचना दिली. पिण्याच्या पाण्यात फ्लोराईडचे प्रमाण जास्त असल्यास (१.५ पीपीएम पेक्षा जास्त) मफ्लोरोसिसफ नावाचा आजार होऊ शकतो. ज्यामुळे दात आणि हाडांचे गंभीर विकार होतात. यामुळे फ्लोराईडयुक्त पाण्यापासून बचाव करणे अत्यंत आवश्यक असल्याची माहिती यावेळी दिली**

३ पीपीएम फ्लोराईडयुक्त पाणी हे पिण्यायोग्य नसल्याचे सांगितले. फ्लोराइडयुक्त पाणी पिल्याने दात ठिसूळ व कमजोर होतात. अनेक दिवसांपर्यंत फ्लोराइडयुक्त पाण्याचा वापर केल्यास हाडेसुद्धा कमजोर होतात. याशिवाय विविध प्रकारच्या शारीरिक आजार उत्पन्न होतात. त्यामुळे गावकऱ्यांनी असे पाणी न पिता दुसऱ्या जलस्रोतांचे पाणी पिण्यासाठी वापर करावा. घरगुती, इतर वापरासाठी त्याचा वापर करण्यास हरकत नसल्याची माहिती यावेळी दिली.

# मान्सूनपूर्व नाले सफाईला सुरूवात

**गोंदिया :-** पावसाळा तोंडावर आला असून कधीही वरूणराज हजेरी लावू शकतात. अशात तुंबलेल्या नाल्यांतील पाणी शहरवासीयांच्या घरात शिरण्याचे प्रकार शहरात घडतात. यंदा तसे प्रकार घडू नये म्हणून नगर परिषद स्वच्छता विभागाने मान्सूनपूर्व सफाई अभियानाला गुरुवारपासून (दि.१४) सुरूवात केली आहे. यांतर्गत पाणी वाहून नेणाऱ्या मोठ्या नाल्यांची जेसीबी लावून सफाई केली जात आहे. जेणेकरून पावसाच्या पाण्याच्या निकासीतील अडथळा दूर होणार.

शहरातील स्वच्छतेबाबत काही सांगण्याची गरजच नाही अशी स्थिती आहे. एरवी हा प्रकार चालत असून पावसाळ्यात मात्र तुंबलेल्या नाल्यांतील पाणी शहरवासीयांच्या घरात शिरण्याचे प्रकार दरवर्षी घडतात. शहरातील खोल भागातील नागरिकांना या प्रकाराचा जास्त फटका सहन करावा लागतो.

यामुळे मान्सूनपूर्व सफाई अभियान राबवून शहरातील मोठे नले व अंतर्गत नाल्यांची सफाई केली जाते. त्यानुसार, मुख्याधिकारी संदीप बोरकर यांच्या निर्देशानुसार यंदाही नगर परिषद स्वच्छता विभागाकडून सफाई अभियानाला गुरुवारपासून (दि.१४) सुरूवात करण्यात आली आहे. शहरातील सुर्याटोला परिसरातील नाल्याच्या सफाईने हे अभियान सुरू करण्यात आले असून जेसीबीच्या माध्यमातून मोठ्या नाल्यांतील गाळ व झाडझुडप काढले जात आहे. शहरातील मोठ्या नाल्यांतून पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात निघत असल्यामुळे त्यांची स्वच्छता सर्वप्रथम हाती घेतली जाते. जेणेकरून पाऊस आला तरी पाण्याची निकासी होणार. यानुसार, अगोदर जेसीबीच्या माध्यमातून मोठ्या नाल्यांच्या सफाईचे काम स्वच्छता विभागाकडून केले जात आहे.

### अंतर्गत नाल्यांची सफाईही झाली सुरू

मोठ्या नाल्यांच्या सफाईला सुरूवात करण्यात आली असतानाच शहरातील अंतर्गत नाल्यांचीही प्रभागनिहाय सफाई केली जात असल्याचे दिसत आहे. पावसाळा बघता सफाई कर्मचारी नाल्यांतील कचरा व गाळ काढून नाल्यांना रिते करीत आहेत. जेणेकरून पावसाचे पाणी रस्त्यावर येऊ नये व ते कुणाच्या घरात शिरू नये. मात्र दरवर्षी मान्सूनपूर्व सफाई अभियान राबविल्यानंतरही काही भागांमध्ये शहरवासीयांच्या घरात पाणी शिरण्याचा प्रकार घडतोच.



# गोंदिया जिल्हा सलग चौथ्यांदा राज्यात "प्रधानमंत्री आवास योजनेत' प्रथम

**गोंदिया :-** ग्रामीण भागातील नागरिकांना हक्काचे घर मिळवून देणाऱ्या मप्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणफ अंतर्गत गोंदिया जिल्ह्याने दैदीप्यमान कामगिरी केली असून चौथ्यांदा राज्यात प्रथम येण्याचा विक्रम केला आहे.

केंद्रीय ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्री शिवराजसिंग चव्हाण यांच्या शुभहस्ते आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंदिया जिल्ह्याला प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी स्वीकारला.

महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत जाहीर झालेल्या राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये गोंदिया जिल्ह्याने संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विशेष म्हणजे, या योजनेत राज्यात अव्वल येण्याचा बहुमान गोंदिया जिल्ह्याला सलग चौथ्यांदा मिळाला आहे. जिल्ह्याने आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. या यशाचा गौरव करण्यासाठी आज शुक्रवार रोजी



सातारा येथील सैनिक स्कूलमध्ये भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले.

जिल्ह्याने मिळवलेल्या या यशात जिल्हा परिषद प्रशासन आणि ग्रामीण विकास यंत्रणेचा मोठा वाटा आहे. जिल्हयाने राज्यस्तरीय प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच विभागीय स्तरावरही नागपूर विभागाने आपली छाप सोडली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत नागपूर विभागाने राज्यात तृतीय क्रमांक पटकवला आहे, तर राज्य पुरस्कृत आवास योजनेत नागपूर विभाग राज्यात प्रथम ठरला आहे. सलग चौथ्या वर्षी मिळालेल्या या ऐतिहासिक यशामुळे जिल्ह्याचे नाव संपूर्ण राज्यात गाजत आहे.

लोकसहभाग आणि सांघिक प्रयत्नांचा विजय: जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर

ङ्कप्रधानमंत्री आवास योजनेत गोंदिया जिल्ह्याने सलग चौथ्यांदा राज्यात प्रथम क्रमांक पटकावणे ही आम्हा सर्व जिल्हावासीयांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे, अशी प्रतिक्रीया पूरस्कार स्विकारल्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी दिली. ते पुढे म्हणाले, जिल्हा परिषद प्रशासन, ग्रामीण विकास यंत्रणा आणि प्रत्यक्ष जमिनीवर काम करणारे कर्मचारी यांच्या चिकाटीमुळेच हे यश शक्य झाले आहे.

मुख्य म्हणजे लाभार्थ्यांनी प्रशासनावर दाखवलेला विश्वास आणि दिलेला प्रतिसाद यामुळेच आम्ही हा मचौकारफगाठू शकलो. गरीब कुटुंबांच्या डोक्यावर हक्काचे छप्पर असावे, हे आमचे मुख्य ध्येय असून जिल्ह्याचा हा लौकिक भविष्यातही असाच कायम राखण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.ङ्क असे ही श्री. भेंडारकर म्हणाले.